# प्रभुतरुण दिवाळी अंक २००९

## अंतरंग


संपादकीय : सुहासिनी कीर्तिकर

विस्तारीत संपादकीय : संजना कोठारे

मुकुंद अजिंक्य, सुहासिनी कीर्तिकर, सॉ. राजन जयकर, डॉ. सुमन नवलकर, उदय जयकर, नंदकुमार कृ. विजयकर, उज्ज्वला गोविंदराव भगवंतराव आगासकर, अलका तळपदे

*FIRST TIME*

*Introduction* - Meenakshi Jayakar

Mayura Nayak, Achala Subhash Desai, Anusha Agaskar, Shubhada Suresh Agaskar, शौनक कौशिक जयकर, श्रेया शैलेंद्र तळपदे

*IDEAL DATE*

*Introduction* - Sushmita Kothare

Kashmira Ajinkya, Niket Navalkar,Swpnil Vyavaharkar, Nishita Dhairyawan, Sushmita Kothare, Swapnil Desai

*KANDE-POHE*

*Introduction* - Sanjana Kothare

Chandini & Rajesh Ajinkya, Monisha & Gautam Kothare, Pooja & Mandar Kothare, Mrunal & Bakulchandra Navalkar, Bharati & Rasik Vijaykar, Pavitra & Pradeep Kirtikar, Trisha & Salil Vijaykar, Arti & Santosh Dhairyawan, Shweta & Raj Mankar, Meghna & Meghdeep Jayakar

*Dream Home, & Reality!*

Pradeep C. Dhairyawan, Dr. V. C. Manker,Prabhanjan Dhurandhar, Pravin Velkar, Pradip Kirtikar

***Kiddy Treat***

*Introduction* - Mayura Nayak

Anjor Kothare, Aditi Vijaykar, Aditi Desai, Shriya Jayakar, Neeshka Kothare, Neil Rane, Ishaan Kothare, Yash Talpade, Yashesh Kirtikar, Moesha Kothare, Sanika Navalkar, Jay Kothare, Krish Mankar, Soumil Kothare, Leena Kirtikar, Vaijayanti Ajinkya

**कविता**

तेजस्विनी मानकर, कल्पना सुभाष कोठारे

**वात्रटिका**

सुमन नवलकर, अजित तळपदे

मुखपृष्ठ : Think Creative Communications

अंतर्गत सजावट : वैजयंती कीर्तिकर

**आणि खास आकर्षण**

**व्यंगचित्रे : प्रदीप कोठारे**

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

दिवाळी अंक

मूल्य रुपये दहा

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

संपादिका : **सुहासिनी कीर्तिकर**

**www.prabhutarun.com**

कार्यकारी संपादक मंडळ :
**मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

**वर्ष ८६ वे)** **ऑक्टोबर- नोव्हेंबर २००९** **(अंक ९६५**

*संपादकीय*

# शुभेच्छा

**-सुहासिनी कीर्तिकर**

रसिकहो,

'दिन दिन दिवाळी, गाई म्हैशी ओवाळी' हे लोकगीत मला शाळकरी वयात अभ्यासाला होतं. नंतर अनेक दिवाळ्या माझ्या आयुष्यात 'लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया' घेऊन आल्या. माझं जगणं उजळून गेल्या. आता या वयात विचार करताना वाटतं; लोकगीतात 'गायी म्हैशी' का आल्या?- तर ते वैभवाचं, समृद्धीचं सुचिन्ह असलेलं गोधन होतं. आपल्या समृद्धीच्या कल्पना मागं पडल्या अन् गोधन, वाडा वगैरे इतिहासजमा झाल्यागतच झालं. आता नवीन कल्पना, नवीन अपेक्षा, नवीन वैभवी धुमारे आणि त्यासाठी सार्थपणे धडपडणारी नवीन पिढी. जसं 'अष्टपुत्रा' गेल्या अन् 'एकुलता एक'वर आपण आलो; तसंच हे. आज 'प्रभुतरुणा'ला नवे धुमारे फुटताहेत. त्याची समृद्धी म्हणजे 'युवामंच'ची वाटचाल अन् रसिकहो अर्थातच तुमचा प्रतिसाद.

त्यासाठी '''युवामंचा' ओवाळी'' असंच मला तरी म्हणावसं वाटतंय. कारण हीच आपली संपत्ती आहे. 'युवामंच'ची आमची मुलं या दिवाळी अंकासाठी पुढं आलीत. श्रीनल कोठारेंच्या मदतीनं वेगळ्या तऱ्हेनं त्यांनी या प्रभुतरुण दिवाळी अंकाला सुभग आकार दिला आहे. सर्वस्वी स्वतःच्या मेहनतीनं, अत्यंत गतिमान आयुष्यात त्यासाठी रात्रीचा वेळ देऊन, कल्पकता लढवून, ज्ञातीकार्याची जाण ठेवून, आणि मुख्य म्हणजे सांघिक बळ एकवटून त्यांनी प्रभुतरुणाची दीपावली या अंकात साजरी केली आहे. आपला जोडा आपल्या मुलाच्या पायात येऊ लागला की म्हणतात ना; 'पुत्र मित्रवदाचरेत्!' तशी ही युवामंचचीही मुलं आता माझी 'मित्रवत्' झालीयेत. रसिकहो, मला खात्री आहेच की, तुमचीही हीच भावना असेल. असेल नव्हे; आहेच.

म्हणूनच या मुलांना मनभरून आशीर्वाद देत

नेहमीच्या मान्यवरांनी या अंकात वस्ती केलीय. प्रकृती ठीक नसतानाही श्री. मुकुंद अजिंक्य आमच्यासोबत आले. शब्द टाकताक्षणी श्री. राजन जयकर, सुमन नवलकर, नंदकुमार विजयकर, उज्ज्वला आगासकर तत्परतेने साद देते झाले. श्री. उदय जयकरांनीही प्रवासवर्णन केलेय. श्री. प्रदीप कोठारेंची चित्रं (व्यंगचित्रे, हास्यचित्रे...काहीही म्हणा;) 'मा विद्विषावहै।' म्हणत दिवाळीच्या आनंदासाठी तुमचा टाळीचा हात मागताहेत. रसिकहो, आणखी काय हवं? जाहिरातदार, देणगीदार, लेखक, कार्यकर्ते, वाचक यांनी आम्हाला सततच सहकार्याची टाळी दिली आहे. म्हणूनच कोणतीही टाळाटाळ न करता मी तुम्हा सर्वासर्वांचे मन:पूर्वक आभार मानते.

तुम्हा सर्वांना ही दिवाळी, येणारे नूतन वर्ष सुख, शांती, समाधान, समृद्धी यांनी भरभरून लाभो. सामाजिक, वैचारीक, आर्थिक, शैक्षणिक... अशा नानाविध क्षेत्रात अस्थिरता असताना तुम्हा सर्वांच्या आयुष्यात मात्र निकोप स्वास्थ वास करो; अशी मनापासून शुभेच्छा.

---

***विस्तारीत संपादकीय***

# Changing with Times!

**-Sanjana Kothare**

Salutations to the heart and soul of Prabhu Tarun, our ex- editor Mr. Suhas Kothare who has been the person behind the repute and the literary value and recognition earned by Prabhu Tarun and also to our next ex-editor, Mr. Vihang Nayak who transformed the look of Prabhu Tarun in the past decade, by bringing out several changes in the working and execution of Prabhu Tarun by promoting the youngsters who had taken a back seat despite of the formation of Yuva Manch by Mr Suhas Kothare way back in 1995.

The Prabhu 'Taruns' have brought the year 2009 with a bang, along with a group of enthusiastic youngsters from the community who have been willingly playing a pivotal role in facilitating with the revamping of Prabhu Tarun's Yuva Manch which has brought forth many interested youngsters sharing the similar goals of our team which we, the co-editors have time and again brought forth in our articles written in our mouth piece - Prabhu Tarun.

As we made a head start with Pratyush – A new rising in June this year we have continued with our ventures by introducing the social cause of 'Eye Donation' which has been adopted by Prabhu Tarun Yuva Manch naming our project ***'Drishti'.*** Eye Donation camps shall be organized under the Prabhu Tarun Yuva Manch banner inorder to create the much required social awareness of Eye donation. Our co-editor, Vaijayanti Kirtikar has given the coverage behind the adoption of this project by Prabhu Tarun in her article published the September issue. Prabhu Tarun Yuva Manch takes pride in being the first Parbhi organization which has taken up a social cause not only for our community members but for the society at large.

Now having done with one of our social awareness camp, the team got set for the next venture of working on the Diwali issue of Prabhu Tarun which is of prime importance, being the single magazine published in the entire year besides the regular newsletter which is published every month. The team geared up for some brain storming sessions for giving the magazine a youthful look at the same time preserving its culture, authenticity and dignity.

The team of Prabhu Tarun Co-editors, the trustees Mr. Gunjarav Nayak and Mr. Deepak Kothare along with the much appreciated assistance of a few Yuva Manch members like Kashmira Ajinkya, Sushmita Kothare, Janhavi

Kirtikar and Mithil Navalkar has helped us in bringing out this Diwali issue in a unique format. The team got done away with the typical look of Prabhu Tarun, once again giving it a conceptualized look with the brainwave of Mr. Shrinal Kothare of Think Creative Pvt. Ltd. who has taken umpteen efforts to put up this issue by working throughout the nights. Mr. Shrinal Kothare has been our visualizer in projecting what the team had in mind thereby giving our Diwali issue this conceptualized cover page besides formatting the new sections which have been introduced by us. We extend our appreciation for the valuable time Mr. Kothare has spent for us and also for the use of his office space which had been converted into a second home for us to work on this issue throughout the night.

The founder members of Prabhu Tarun have been instrumental in preserving our Indian culture and values however having their own drawbacks by not willing to accept the social changes. However the change in Prabhu Tarun's approach and the acceptance of the social changes in the society to a more modern and non-conservative way of thinking was brought by the then editor of Prabhu Tarun Mr. Suhas Kothare. It was rightfully pointed out by Mr. Veerpal Rane at Prabhu Tarun's birthday celebration on 23rd August 2009 that Mr. Suhas Kothare had always been instrumental in accepting and welcoming the youth and had always welcomed the change by having a broader perspective and modern approach towards life. Mr. Veerpal Rane also mentioned that it was Mr. Suhas Kothare who was instrumental in socially accepting intercaste marriages in our community which were boycotted and given the intercaste marriage couples a recognition and acceptance in the community. The tradition of changing with the times has been carried forward by the present team of Prabhu Tarun trustees and editors as accepting changes and adapting oneself to those changes is the key to success and being in pace with the changing times.

The cover page depicts the launch of our Prabhu Tarun Web site which had been launched on 6th June 2009 to reach across to a larger readership. It also shows that Prabhu Tarun has always been open to welcoming and accepting the changes brought forth by the Gen next and is willing to adapt itself to the current needs, demands and requirements of this generation. Through our cover page we show the globalization and the mode of communication which has been accepted world wide, the internet being the easiest and the most preferred mode of communication and information. Prabhu Tarun has now gone global with an attempt to reach out to more and more Pathare Prabhus across the globe and get them connected to each other through this mode of communication by launching our web site – prabhutarun.com. With a nominal life time membership charges the newsletter as well as the yearly magazine is available for online access. We take this opportunity to inform you all that the web site will not only bear the Prabhu Tarun newsletter and the Diwali issue but we have many more attractions in store for you on the Web site which will also make hiring the web space lucrative for entrepreneurs who would like to advertise on our web site. The attractions which will be launched very soon will make the web site more interesting to browse for all age groups once again making it a universally accepted site catering to the young and old, men and women equally.

The most crucial part was that the Diwali issue also needed to change with the times and evolve with the change, keeping in mind the preferences of the current and prospective readers. We have tried to give the magazine a U/A certificate by making it an interesting reading material for all age groups. Prabhu Tarun is striving to make its contents appeal to all genres of people. As we have always maintained, Prabhu Tarun is 'of' the people, 'for' the people and 'by' the people and we stand by our claim as we have invited articles from all age groups with the sole purpose of involving all age groups in the making of the Magazine to gain universal acceptance. We have contributions in terms of write ups of a 6 year old to a 60 year old

showcasing in this current Diwali edition.

Our sole purpose was to involve as many people possible which we have achieved by giving exclusive space for all our writers by classifying the issue into sections for each group of readers. We have given a brief introduction for every section highlighting the subject and stating the reason behind this venture. The issue comprises of articles from our writers who have been giving their valuable contribution in the form of articles for our newsletter as well as for the yearly magazine. To maintain the literary standard of the magazine, a common topic was given to these writers, 'My first time' which has been tackled differently by all, giving the magazine a variety of articles written on a common subject. It gives us an insight to the different perception of different people which has been derived from a common subject.

Besides the articles, we have also introduced a Kids zone named 'Kiddies Treat' especially designed for the kids who would find it interesting to pick up the magazine and go through their articles and that of their peers and have an enjoyable reading. The kids having a 1 on 1 with God has specially been published in their own hand writing so as to give it a more personalized look along with a brief of their personal favourite things in the form of a scrap book. The Teen Zone has been introduced to enable the youth to express their views and opinions about their favourite topic, 'Dating' and involve them in reading about the topic which is of utmost importance and interest to their age group.

Another section of prime importance for married couples covering all age groups is the Kande Pohe section which provides a light entertaining reading about the typical first meeting taking place between the couples going in for an arranged marriage. The coverage of beautiful houses concludes the introduction of new sections in this Diwali Issue showing us the preservation of culture at the same time keeping the houses ultra modern having a perfect blend of culture and a modern outlook, not to mention the talented architects of our community who not only beautify the houses of other people but also live in houses worth a 'dekho'. These beautiful houses depict the rich culture and tradition of our 'Pathare Prabhu' community which has still been preserved till date, taking us back to the bygone era which has not been witnessed by the present generation. Our due respect and gratitude to all the 5 families who have let us have a peek at their private abode and moreover let us share it with all of you.

Although the older generation might miss out on some hard core literary value articles, one must not forget that this was our attempt to include one and all in reading the magazine which is 'of' the people, 'for' the people and 'by' the people. We the board of trustees, the editor and co-editors of this coveted magazine and newsletter take this opportunity to thank one and all for their valuable contribution towards publishing this issue including the people instrumental in getting advertisements for us and the support extended by all of you who have contributed towards this issue in any way, even if it was sending us the articles on an extremely short notice.

May this Diwali bring in a lot of good luck and prosperity to all our readers and enable us to achieve our motive of reaching across to many more Pathare Prabhus across the world and help us get them united on one common platform of ***prabhutarun.com*** which will be much more attractive in the coming year. We at Prabhu Tarun at our modest best would like to give all Pathare Prabhus a gift for the New Year in the form of an attractive web site which would enable us to connect and interact with each other thereby keeping track of what is happening in the community on the whole on one common platform. We also have many more attractions on the web site which will be introduced in the coming months. So get yourself registered soon and keep checking the Prabhu Tarun issues for more news about your ***Prabhu Tarun Online***. So be in tune with the changing times and get yourself registered on **prabhutarun.com** to keep you updated and connected with the rest of the PP's worldwide. We wish one and all a very Happy Diwali.

# ऐंशीच्या उंबरठ्यावर

## ❀ मुकुंद अजिंक्य ❀

आमची आई (ती. बाय) मला नेहमी एक आशीर्वाद द्यायची. ''म्हातारा हो.'' ती 'आयुष्यमान भव ।' किंवा 'मोठा हो', किंवा 'दीर्घायुषी हो' असं म्हणत नसे. अगदी कळवळ्याने म्हणायची, 'म्हातारा हो'. आता वयाला ७९ वर्षे उलटून नऊ महिने झाले. पांडुरंगाची कृपा असेल तर २०१०च्या जानेवारीच्या १० तारखेस मी ८० वर्षांचा होईन. म्हणजे एका अर्थाने ती. बायने दिलेला आशीर्वाद फळास आला. मला स्वत:ला मी ८० वर्षे पुरी करीन की नाही याची शंका आहे. परंतु सध्या तरी ८०च्या उंबरठ्यावर आहे. तेव्हा आतापर्यंत वेचलेल्या आयुष्याचा लेखाजोखा (मी सिंहावलोकन वगैरेसारखे शब्द वापरणार नाही) मांडावा असे मनात आले.

वय झाले तरी स्मृती अजून शाबूत आहे. तेव्हा इथवरल्या आयुष्यात काय मिळविले, काय गमावले, आयुष्याला वळण देणाऱ्या घटना कोणत्या, कोणी कसे संस्कार केले ह्याचे हे थोडे विचारमंथन.

खऱ्या अर्थाने मी मुंबईचा. माझा जन्म मुंबईतल्या गिरगावातला. पालवावरच्या 'देसाई हाऊस' मधला १९३० सालचा. मुंबईवर हक्क सांगणारे, मराठी माणसाच्या नावाने राजकारण करणारे खूप नंतर आले. माझ्या जन्माआधी १९२६ साली वडिलांनी खारला बंगला बांधला होता. त्याचे नाव 'संत निवास'. माझे प्राथमिक शिक्षण म्युनिसिपालिटीच्या शाळेत झाले. 'वांद्रे म्युनिसिपालिटी शाळा खाते-शाळा नं. ५' असे आमच्या शाळेचे नाव. तिशीच्या दशकात दुसऱ्या कोणत्या शाळा नसायच्या. Convent, KG हे सर्व नंतर आले. 'शाळा नं. ५' ही चौदाव्या रस्त्याच्या व १३व्या रस्त्याच्या कॉर्नरवर एका बैठ्या कौलारू इमारतीत होती. बिगरी व पहिली ते चौथी अशा चार इयत्ता असत. तेव्हा त्या शाळेत शिकलो. त्याने आमच्या शिक्षणाचा पाया घातला. तो भक्कम होता. बाकाखाली दप्तर, टेकायला पाठीमागे काही नाही, डेस्क नाही. तोंडचे हिशोब शाळेच्या व्हरांड्यात घातले जायचे. पाटी खाली ठेऊन आम्ही लाईनीने उभे राहात असू. मास्तर (मला वाटते, त्यांचे नाव सिक्वेरा होते) करड्या आवाजात उदाहरण द्यायचे; त्यानंतर मनातल्या मनात ते उदाहरण सोडवून दिलेल्या अवधीत पाटी उचलून उत्तर लिहीत असू. मास्तर हातात छडी घेऊन फिरत असत. असे असत 'तोंडचे हिशोब' किंवा आताचे Mental Sums. दसऱ्याच्या दिवशी सरस्वतीपूजन असायचे. आम्ही पाटीवर सरस्वती काढून शाळेत जात असू व शाळेत सरस्वतीपूजन करून घरी परतत असू. चौथी इयत्ता म्हणजे प्राथमिक शाळेचे शेवटचे वर्ष. म्युनिसिपालिटीच्या सर्व शाळांमध्ये चौथीच्या शाळेच्या वार्षिक परीक्षेचे पेपर्स सारखे असायचे. ही परीक्षा झाल्यानंतर इंग्रजी शाळेचे वेध लागत असत. १९३९ साली माझी चौथीची परीक्षा झाली. निकालाच्या दिवशी आमच्या हेडमास्तरांनी मला त्यांच्या खोलीत बोलाविले. तोंडावरच्या एरवी करड्या चेहऱ्यावर किंचित स्मित आणत ते मला म्हणाले, ''म्युनिसिपालिटीच्या सर्व शाळांमधून चौथीच्या परीक्षेत तू पहिल्या क्रमांकाने पास झाला आहेस. वांद्र्याच्या म्युनिसिपालिटीच्या पटांगणावर बक्षिस समारंभ होईल त्यावेळी तुला हजर रहावे लागेल.'' पहिला नंबर आल्याचा आनंद झाला खरा;

पण वांद्र्याला बक्षीस समारंभासाठी कसे जायचे; ह्याचीही काळजी लागली.

यथावकाश एका ट्रकमध्ये घालून आम्हा सर्वांना म्युनिसिपालिटीच्या समोरील मोठ्या पटांगणावर नेण्यात आले. (आता तेथे भाभा हॉस्पिटल आहे) व मला 'रामतनय'चे 'खरा उद्धार' हे पुस्तक बक्षिस म्हणून मिळाले. ते माझे पहिले बक्षिस व मला वाचावयास मिळालेले पहिले पुस्तक. ह्या घटनेमुळे दोन गोष्टी झाल्या. माझ्या कुटुंबीयांची माझ्याकडून प्रत्येक परीक्षेत पहिला यावे ही अपेक्षा वाढली व मला वाचायची आवड वयाच्या दहाव्या वर्षी लागली. पुढे इंग्रजी शाळेत गेल्यानंतर हरी नारायण आपटेंची सर्व पुस्तके, उदा. 'केवळ स्वराज्यासाठी' 'गड आला पण सिंह गेला'; मी ओळीने वाचून काढली. ऐतिहासिक कादंबऱ्यांची आवड निर्माण झाल्यावर विठ्ठल वामन हडप, नाथमाधव (त्यांचे वीरधवल अजूनही शहारे आणते अंगावर) ह्यांची पुस्तके अधाशासारखी वाचून काढली. इंग्रजी पहिली व दुसरी आर्यन शाळेच्या खार शाखेमध्ये पहिल्या नंबराने पास झालो. परंतु ही शाळा बंद पडली (त्यावेळी 'बुडाली' असा वाक्प्रचार होता) म्हणून तिसरीसाठी विद्यामंदीर ह्या नव्याने सुरू झालेल्या शाळेत गेलो. तिसरीच्या परीक्षेत माझ्या हातून पहिला नंबर गमावून तिसऱ्या नंबरावर येण्याचा अक्षम्य गुन्हा झाला. माझ्या वडिलांनी आणि मोठ्या भावाने मला काहीही न विचारता, न सांगता सांताक्रुझच्या आनंदीलाल पोद्दार हायस्कूल ह्या त्यावेळी मोठ्या समजल्या जाणाऱ्या शाळेत बदली केली. ह्या शाळेत मी चौथीपासून सातवीपर्यंत (मॅट्रीकपर्यंत) शिकलो. पहिला नंबर मिळविण्याची आणि टिकविण्याची खबरदारी घेतली, नव्हे घ्यावी लागली. चौथीत गणितामध्ये पैकीच्यापैकी व पाचवीत ९८ टक्के गुण मिळविले.

पोद्दार स्कूलमधील चार वर्षे अत्यंत समाधानकारक गेली. शिक्षक चांगले होते. शाळा जरी गुजराती मंडळीची होती; तरी शिक्षणाचे माध्यम इंग्रजी होते. त्यावेळी (१९४६ साली) मॅट्रिकच्या वर्षात इंग्रजी हे फक्त व्याकरण व निबंध शिकण्यासाठी असायचे व इंग्रजी व्याकरणाचे वेगवेगळे पैलू शिकविण्यासाठी जवळजवळ पाच वेगवेगळे शिक्षक होते. Analysis, Synthesis, Parsing, one word for phrases & clauses & their usages अशा इंग्रजी व्याकरणाच्या वेगवेगळ्या अंगांवर आमच्याकडून घट्ट तयारी करून घेतली जात असे. त्यामुळे माझे इंग्रजी पक्के झाले. एलफिंस्टन कॉलेजमध्ये मॅट्रिक पास झाल्यानंतर गेलो तेव्हा मला इंग्रजी बोलण्याबद्दल कोणत्याही प्रकारचा गंड मनात राहिला नाही. सध्यातर इंग्रजी वर्तमानपत्रांच्या कॉलममध्ये, अगदी संपादकीयातसुद्धा अनेक चुका (Grammatical Error) आढळतात व तशा चुका इंग्रजी भाषेचा एक भाग बनू लागला आहे. असो.

एलफिंस्टन कॉलेजमध्ये १९४६ ते १९५२ ही सहा वर्षे काढली. त्यात बी.ए.शिवाय प्रथम वर्ग मिळाला नाही. १९४८ साली मी इंटर आर्टस् ही परीक्षा पास झालो. दुसरा वर्ग मिळाला असला तरी आमच्या वर्गातून पहिल्या पाचामध्ये आलो व मला मेरीट स्कॉलरशीप मिळाली. हे थोडे अनपेक्षित होते. वयाच्या अठराव्या वर्षांपासून २० रुपये महिना मिळू लागले. प्रथमच माझ्या स्वत:च्या कमाईचे पैसै होते. तीन महिने झाले की कॉलेजच्या ऑफिसमध्ये गेलो की रुपये ६० रोख खिशात पडत.

१९४८ साल हे अनेक कारणांकरिता लक्षात राहिले आहे. त्या साली ऑक्टोबरमध्ये मी माझ्या मावशीकडे बनारसला एकटा गेलो होतो. त्या काळात मोगलसराई ह्या स्थानकावर गाडी बदलून बनारसला जाणारी गाडी पकडावी लागे. माझ्या मावशीचे यजमान ती. विष्णूभावोजी रात्री तीनच्या सुमारास मला घेऊन जाण्यास आले होते. त्या साली ऑक्टोबरमध्ये पाऊस पडला होता. मोगलसराई ते बनारस हिंदू विद्यापीठ हा प्रवास आम्ही मावशीच्या गाडीने केला होता. बनारसचे आठदहा दिवसांचे

वास्तव्य अजून लक्षात आहे. तेथील विश्व विद्यालय, भारतमाता मंदिर, सारनाथ ही सर्व स्थळे मनात अजून रुंजी घालताहेत. १९४८ साली मी खारच्या विद्यामंदिरमध्ये झालेले मो. ग. रांगणेकरांचे 'कुलवधु' हे व्यावसायिक नाटक प्रथमच पाहिले. मला अजून आठवते की, इंटरच्या प्रिलीमीनरी परीक्षेच्या आदल्या दिवशी हे नाटक होते व घरातून विरोध असतानासुद्धा मी हे नाटक पाहावयास गेलो होतो. सुरेख नाटक होते. ज्योत्स्ना भोळे व मास्टर अविनाश यांच्या भूमिका असलेले एका नटीच्या जीवनावर आधारलेले हे नाटक होते. ह्यातील गाणी पुढे फारच लोकप्रिय झाली. 'क्षण आला भाग्याचा। आला सौख्याचा हा।' किंवा 'बोला अमृत बोला' ही भैरवी फार गाजली. परंतु माझ्या पसंतीचे त्या नाटकातील गाणे म्हणजे त्यातील गाजलेले द्वंद्वगीत.

'भाग्यवती मी त्रिभुवनी झाले, कुबेर माझा धनी
तुझेच सारे वैभव येथे मी नावाचा धनी
भाग्यवती मी तुमची राणी
भाग्यवान मी नवरा म्हणूनी'

अशा या गाण्याच्या ओळी अजूनही लक्षात आहेत.

१९५० साली मी वीस वर्षांचा झालो व बी.ए.च्या परीक्षेत इकॉनॉमिक्स विषय घेऊन प्रथम वर्गात पास झालो. हा अत्यंत आनंदाचा क्षण म्हणून माझ्या लक्षात राहिला आहे. त्या आधी (१९५०च्या आधी) अर्थशास्त्र हा विषय घेऊन पहिल्या वर्गात येणारे फार थोडे होते. परंतु आम्ही तिघेजण मी, माझा मित्र अशोक सामंत व बापू चौगुले (जो आता हयात नाही) आमच्या कॉलेजातून ह्या वर्षी पहिल्या वर्गात आलो. त्यामुळे एम.ए.च्या अभ्यासक्रमाकरिता 'दक्षिणा फेलोशिप' मला मिळाली. मेरीट स्कॉलरशिपचे महिन्याला रु. २० तर फेलोशिपचे महिन्याला रु. ५० मिळत. त्याकाळी महिना रु. ५० म्हणजे चंगळ होती.परंतु ह्या आनंदाला एका गोष्टीमुळे ठिगळ लागले. त्याविषयी थोडे विस्ताराने लिहावेसे वाटते.



'पाठारे प्रभु सोशल समाज' जसा तो त्या काळी होता तो त्यावेळी ज्ञातीतल्या यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या यशाबद्दल बक्षिसे देत असे व असा बक्षिस समारंभ 'ब्लॉवदस्की लॉज' मध्ये होत असे. ह्यात प्रतिष्ठेचे समजले जाणारे म्हणजे 'बी. के. धुरंधर गोल्ड मेडल'. हे मेडल बी.ए.च्या परीक्षेत पहिल्या येणाऱ्यास दिले जात असे. बाळाराम कृष्णनाथ धुरंधर हे आपल्या ज्ञातीतील विद्याविभूषित व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी बी.ए. फर्स्ट क्लास मिळवून पुढे मुंबईच्या लॉ कालेजचे पहिले भारतीय प्रिन्सिपॉल म्हणून नाव कमावले होते. त्यांच्या नावाने समाजामध्ये ठेवले गेलेले मेडल प्रतिष्ठेचे मानले जात असे. बी. के. धुरंधर ह्यांच्या व्यक्तिमत्त्वाची तीन वैशिष्ठ्ये होती. ते बी. ए.ला पहिल्या वर्गात आले होते, त्यांनी तुकाराम महाराजांचे चरित्र लिहिले होते व ते स्वत: वारकरी संप्रदायावर प्रवचने करीत. कुणाच्याही व्यक्तिमत्त्वात ह्यापैकी एक गुण आढळला तर तो पदक मिळविण्यास पात्र समजला जात असे. बी. ए.मध्ये फर्स्ट क्लास मिळाल्यामुळे हे गोल्ड मेडल मिळण्यास मी पात्र होतो. परंतु आपल्या समाजातील आपणास तत्त्वनिष्ठ समजणाऱ्या काही महाभागांचा हे पदक मला देण्यास विरोध होता. मला आठवते की माझ्या बाजूने प्रा. व. दि. राव वगैरेनी मला हे पदक मिळावे म्हणून पुष्कळ वाद घातला. परंतु ते मला मिळू नये असे वाटणाऱ्या ढुढ्ढाचार्यांनी तत्त्वनिष्ठेच्या बुरख्याखाली वाद घालून ते मला मिळू नये म्हणून प्रयत्न केले व त्यात ते यशस्वी झाले व मला ते पदक नाकारण्यात आले. ह्या गोष्टीमुळे मला प्रचंड दु:ख झाले. बी. के. धुरंधर ह्यांचे स्थान आमच्या कुटुंबात फार मोठे होते. माझ्या वडिलांचे ते नुसते आतेभाऊ नव्हते; तर Friend, Philosopher and Guide अशा तऱ्हेचे त्यांचे नाते होते. आमच्या जुन्या घराच्या हॉलमध्ये त्यांचा फोटो असायचा. अशा व्यक्तीच्या नावे दिले जाणारे पदक केवळ आकसामुळे, व्यक्तिगत असूयेपोटी व विद्वेषामुळे मला नाकारण्यात आले ह्याचे वैषम्य मी अजूनही; साठ वर्षांनंतरही विसरू शकलो नाही. त्यांच्या मुलीला (जिला आम्ही बाळारामकाकांची 'बेबी' म्हणून ओळखत होतो) सुद्धा ह्या सर्व राजकारणाची अत्यंत चीड आली व तिने रु. ५००ची समाजाला देणगी देऊन तिच्या वडिलांच्या नावे मला खास बक्षिस द्यावे अशी पा. प्र. सोशल समाजाच्या कार्यकर्त्यांना विनंती केली. थोडक्यात, आपल्या समाजात त्यावेळीही राजकारण चालायचे व अशा राजकारणाचा फटका मला लागला होता. ह्या सर्व घटनेतील गमतीचा भाग म्हणजे जवळजवळ तीस वर्षानंतर, म्हणजे १९८० साली बी. ए. मधून पहिली आल्याबद्दल माझ्या मुलीला हेच पदक मिळाले व तिच्या acceptance speechमध्ये तिने तिच्या वडिलांना हे पदक नाकारले गेले ह्याचा प्रकर्षाने उल्लेख केला.

असाच एक अनुभव १९५२ साली मी स्पर्धा परीक्षेस बसलो होतो तेव्हा आला. तोंडी परीक्षेसाठी (Viva Voci) मला दिल्लीस बोलाविले होते. मी


*JOGESHWARI RESORT*

**SANITORIUM**

Under ISHWARI & VIDYADHAR CHARITABLE TRUST No. 14, Divya Hilltop Cottages, Nangargaon, LONAVALA.

**Fully furnished Double Bedroom Hall & Kitchen Units Equipped with Gas, Stove, Utensils and Refrigerators available on daily charge basis.**

Special concessions available on request for Womens' and Children's Institutions, Aged, Disabled or for other justifiable reasons and medical certificates. Booking made on phone as below. Also available, at the Mumbai address, Wheel Chair, Walkers, Crutches, against refundable deposits only.

*Trustees* : PRAMILA & MADHUKAR TALPADE
102, `PRIYA' Raviraj Oberoi Complex,
SAB T. V. Lane, New Link Road,
Andheri(W), Mumbai-400 053.
Tel. : 2630 3902 / 2630 3906
Mobile : 9821447675

Booking Mobile : 09823884094 / 09422543614

महाराष्ट्र मंडळाच्या इमारतीत महाराष्ट्र सदनमध्ये राहण्यास संपर्क साधला व तशी तयारी केली. तेवढ्यात आमच्या नात्यातील एकीने माझ्या वडिलांना सुचविले, ''मुकुंदाची राहण्याची सोय आपल्या हिच्याकडे होऊ शकते, तो हॉटेलात का राहणार आहे?'' त्याप्रमाणे माझ्या वडिलांनी आमच्या दिल्लीतील ओळखीच्या व्यक्तीशी संपर्क साधला. मला हे पसंत नव्हते म्हणून मी जुन्या दिल्लीतील महाराष्ट्र मंडळाची जागा रद्द केली नाही. माझ्या वडिलांच्या विनंतीला काही प्रतिसाद मिळेना तेव्हा आमच्या बनारसच्या विष्णूभावोजींशी संपर्क साधला. त्यांनी आपल्या दिल्लीत राहणाऱ्या एका विद्यार्थ्याला ज्याची एक जुनी गढी जुन्या दिल्लीत होती तिथे आमच्या राहण्याची व्यवस्था करण्यास सांगितले. 'महेताबसिंग महेबुसिंग जैन' असे त्या जैन विद्यार्थ्याचे नाव होते व ह्या जैन मंडळींचा जुन्या दिल्लीच्या कालान ह्या परिसरात एक भव्य वाडा (गढी) होता. ह्या जागेत मी व माझा मावसभाऊ विजय (राणे) जो मला उतरवून घेण्यासाठी दिल्ली स्टेशनवर आला होता; आम्ही राहिलो. जैनांचे घर असल्यामुळे सूर्यास्तानंतर जेवण मिळणार नव्हते. रात्री ९च्या सुमारास आम्ही तेथील पराठा गल्लीत जेवणास गेलो. भुकेमुळे व्यवस्थित जेवलो, परंतु तेथील पराठे दुसऱ्या दिवशी नडले व पोट बिघडले. दुसऱ्या दिवशी कसाबसा औषधे वगैरे घेऊन उपाशी पोटी आम्ही नवी दिल्ली येथील 'ढोलपूर हाऊस' येथे युनियन पब्लिक सर्विस कमिशनचे ऑफिस होते; तिथे गेलो. मुलाखत सकाळी ११ वाजता होती; परंतु मला बोलविण्यात आले दुपारी ४ वाजता. अशा अवस्थेत माझी मुलाखत घेण्यात आली. ह्याचा परिणाम व्हायचा तो झाला. लेखी परीक्षेत चांगले गुण मिळालेले असतानासुद्धा तोंडी परीक्षेत काठावर पास झालो. त्याच वर्षी परीक्षेस बसलेले के. नटवर सिंग, लेखी परीक्षेत माझ्यापेक्षा कमी गुण मिळाले असतानासुद्धा, तोंडी परीक्षेत ४०० पैकी ३०० गुण मिळवून पहिल्या चार जणात आले व फॉरीन सर्विसमध्ये निवडले गेले. मला चारशेपैकी दीडशे गुण मिळाल्यामुळे माझा नंबर साठावा आला व 'मी इंडियन रेव्हेन्यू सर्विस'साठी निवडला गेलो.

पण माझी आयआरएसमधली कारकीर्द चांगली यशस्वी झाली. कोणताही वशिला न लावता ३८ वर्षांची सेवा (नोकरी) कोणताही अडथळा वा लांछन न लागता पूर्ण झाली. १९५४ ते १९९२ अशा ह्या अवधीत चीफ कमिशनर व मेंबर ट्रिब्युनल ह्या पदापर्यंत विनासंकोच प्रवास झाला. बरे बदलीची नोकरी असूनही फारशा बदल्या झाल्या नाहीत. गुजरातमध्ये पहिली आठ वर्षे (१९५४ ते १९६२); त्यात अहमदाबादेस चार व बडोद्यास चार अशी आठ वर्षे व मुंबईत नंतरची (एखाददुसरे वर्ष सोडता) सर्व तीस वर्षे वेगवेगळ्या पदावर नोकरी झाली. सर्वात ट्रिब्युनलमधील ६ वर्षे १९८६ ते १९९२ मानाची व लक्षणीय गेली. ट्रिब्युनलमधून १९९२ साली, वयाच्या बासष्टाव्या वर्षी निवृत्त झालो तेव्हा दोनतीन निरोप समारंभ झाले. इतर सहाध्यायांचा (Colleagues), I.T. Barच्या वकील वर्गाचा, व Chartered Recon.चा असे अनेक निरोप समारंभ लक्षात राहण्यासारखे झाले.

निवृत्त झाल्यानंतर नोकरीसाठी वा वकिलीचा व्यवसाय करण्यासाठीचे अनेक प्रस्ताव माझ्याकडे आले. परंतु मी ते नाकारले. ज्या ज्या जागी मी न्यायमूर्ती म्हणून काम केले तेथे वकील म्हणून बापूडवाणा होऊन कोर्टाच्याबाहेर वाट पाहत बसण्याची पाळी मला माझ्यावर आणावयाची नव्हती. तरीही मंडळी सल्ल्यासाठी येत. इकॉनामिक्स टाइम्समध्ये आयकर विषयक सल्ला देण्याचे काम मी चालविले.शेवटी अशी एक वेळ येऊन ठेपली की इन्कमटॅक्सचे आता नाव नको, सल्ला देणे नको अशी मनाची अवस्था झाली. आयकर सल्लागार म्हणून गोळा केलेली जवळजवळ पन्नास-साठ पुस्तके मी दान केली व आयकरातून मी खऱ्या अर्थाने निवृत्त झालो. तोपर्यंत

वयाची सत्तरी झाली होती.

बरेच छंद जोपासले. कला, संगीत, साहित्य! शाळेत असताना मला एलिमेंटरी ड्रॉईंगच्या परीक्षेसाठी परवानगी नाकारण्यात आली. परंतु वयाच्या सोळाव्या वर्षापासून सत्तराव्या वर्षापर्यंत चित्रे काढत राहिलो. प्रथम पेन स्केच व नंतर नातवंडांसाठी काढून दिलेली चित्रे. अशी जेव्हा जमेल तशी चित्रकलेची सेवा केली. तरुण वयात आदर्श वाटणाऱ्या व्यक्तींची रेखाचित्रे काढली. नेहरू, गांधी, कस्तुरबा, टागोर, जयप्रकाश नारायण, अच्युत पटवर्धन वगैरेंची रेखाचित्रे असलेले स्केच बुक अजूनही साठ वर्षांनंतर मजजवळ जपून ठेवलेले आहे. तसेच गडकरी, पर्ल एस. बक, विनोबा भावे, अब्राहम लिंकन ह्या मंडळींचीही रेखाचित्रे चाळीशीच्या दशकात काढली. माझ्या आजीचे चित्र मी तेव्हा (१९४६-४७ साली) काढले तर माझ्या आईचे चित्र निवृत्तीनंतर (१९९२ साली) काढले. गणपती व साईबाबासुद्धा माझ्या कुंचल्यातून कागदावर उतरले आहेत.

चित्रकलेप्रमाणे शास्त्रीय (रागदारी) संगीताचा षौक १९५४ सालापासून लागला. कलकत्त्याला दुर्गापूजेनंतर अनेक पट्टीच्या गायकांच्या मैफिली होत. बडे गुलाम अली खाँ ('क्या करु सजनी आये ना बालम' ह्या ठुमरीने वेड लावणारे) अजस्त्र शरीराशी विसंगत अशा मुलायम आवाजाचे, डी. व्ही. पलुस्कर ('ठुमकी चलत रामचंद्र' अशा अनेक भजनांना लोकप्रिय करणारे गोड आवाजाचे), अमीर खान, हिराबाई बडोदेकर, सरस्वती माने अशा अनेकविध गायकांचे संगीत मी ऐकत आलो आहे. पन्नालाल घोषला तर आम्ही खारच्या आश्रमातील दुर्गापूजेच्या समारंभात पन्नाशीच्या दशकात ऐकलेले आहे. उच्च दर्जाचे संगीत ऐकल्यामुळे संगीतासाठी 'कान' तयार झाला. परंतु गळा नव्हता.

तसेच साहित्याची आवड जोपासली व जोपासत आहे. गेल्या वर्षी नोबल लॉरियेट अमर्त्य सेन ह्यांचे Argumentative Intrim हे विचार करायला लावणारे पुस्तक वाचले. इंग्रजी व मराठी साहित्यामध्ये जे जे वाचण्यासारखे आहे ते ते सर्व वाचून झाले आहे. परंतु स्वतंत्र लिखाण करता आले नाही. प्रभुतरुणसाठी गेली २५ वर्षे लिहिले तेवढेच. तसेच भरपूर प्रवास केला. 'केल्याने देशाटन । पंडीत मैत्री सभेत संचार' हे आतापर्यंत बरेच झाले. भारतभर तर फिरलोच; परंतु अमेरिका, बँकॉक, हाँगकाँग, नेपाळ हे सर्व देश पाहिले. भारतात तर काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत व कच्छपासून कोलकत्यापर्यंत नव्हे; दार्जिलिंग-गँगटोकपर्यंत सर्वत्र सपत्नीक प्रवास केला. तीर्थक्षेत्रेसुद्धा झाली. आता मात्र पुण्यापर्यंतचा प्रवासही थकवा आणतो. एकंदरीत आजवरचे आयुष्य बरे; नव्हे चांगले गेले.

कोणाविषयी मनात आकस ठेवला नाही, कोणाचे वाईट चिंतीले नाही. परंतु माझ्या चांगुलपणाचा फायदा घेतला गेला अशी एक भावना नेहेमी मनात राहिली आहे. माझ्या प्रत्येक यशात, अपयशाचे; प्रत्येक जयात पराजयाचे बीज रोवले गेले असा अनुभव अनेकवेळा आला.

अनेक आप्तांचे वा इतरांचेही अनेक प्रश्न येत. कोणाला नोकरी हवी असे, तर कोणाला शाळेमध्ये ॲडमिशन. सर्वांची शक्यतोवर सर्व कामे कोणतीही अपेक्षा न करता केली. परंतु बहुतेकवेळा 'कामापुरता मामा' ह्या म्हणीचा अनुभव आला. कृतज्ञतेपेक्षा कृतघ्नतेचा अनुभव अनेक वेळा आला. परंतु आता त्याचे काही वाटेनासे झाले आहे. कदाचित वयाचा परिणाम असेल. तसा आता मी समाधानी आहे. आता कोणाकडूनही काहीही अपेक्षा नाही. दररोज सकाळी आंघोळीनंतर देवपूजेचा भाग म्हणून मी 'गणपती अथर्वशीर्ष'चे पठण करतो. तसेच ज्ञानेश्वर महाराजांचा हरिपाठही म्हणतो. अथर्वशीर्षात म्हटल्याप्रमाणे

ॐ सहनाववतु ।। सहनौ भुनक्तु ।। सह वीर्यं करवावहै ।। हे जसे मनावर कोरले आहे तसेच हरिपाठाच्या अठ्ठाविसाव्या अभंगात म्हटल्याप्रमाणे

'असावे एकाग्री स्वस्थ चित्त मति ।। उल्हासे करून स्मरण जीवी ।।

अंत काली तैसा संकटाचे वेळी ।। हरि त्या सांभाळी अंतर्बाह्य ।।'

इति हरी ओम्.

# अनोळखी

## ❀ सुहासिनी कीर्तिकर ❀

सुमाताई सुन्न होऊन बसल्या होत्या. अवतीभोवती सारा दिमाखदार संसार. वैभवाची चिन्हं. आता मात्र त्यांना काहीच रया नव्हती. सकाळ असूनही प्रकाश पारोसा वाटत होता. शेजारच्या संगीताबाई जवळच बसल्या होत्या. शेजारधर्म म्हणून? अंहं. संगीताबाईंची रुही सुमाताईंच्या प्रियांकाबरोबरची. एकाच कॉलेज-मधल्या दोघी. एकच विषय दोघींचा. क्लासही दोघींनी लावला तो एकत्रच. त्यामुळं रुही आणि प्रियांका सदैव जोडीजोडीनं जायच्या. काल त्यांची टेस्ट होती म्हणून एकत्रच घराबाहेर पडल्या. सुमाताईंच्या ड्रायव्हरनं त्यांना सोडलं होतं- पण परतल्या त्या दोघी नाही! रुही एकटीच परतली. सुमाताईंना वाटलं, असेल काहीतरी कारण. मात्र संध्याकाळ टळून गेली. सुमाताईंच्या नेहमीच्या टी. व्ही. सिरीयल्स बघून झाल्या. मैत्रिणींशी फोनवर गप्पाटप्पा झाल्या. पार्वतीबाईंनी संध्याकाळी येऊन स्वयंपाक केलेलाच होता. तो गरम करून घ्यायचा होता. सुमाताई पियूची वाट पाहत होत्या. किती वेळ पाहायची वाट? टेस्ट झालीय्. आता जरा विरंगुळा म्हणून पियू गेली असेल कोठेतरी. पण इतका वेळ? सुमाताईंना चैन पडेना. त्यांनी परत एकदा रुहीकडे फोन लावला. उचलला संगीताबाईंनी.

'हॅलोऽऽ'

'हॅलो, मी सुमाताई, जरा रुहीला द्या बरं.'

फोनवर रुही आली. 'हॅलोऽ'

'अगं पियू बोलली का तुला काही? कुठं जातेय वगैरे.''

रुही थोडी घुटमळली. सांगावं की नाही? सुमाताईंनाही रुहीचं न बोलणं आतून कळलंसं वाटलं, 'नक्कीच काहीतरी वेगळं आहे, जे रुहीला मला सांगायचं नाहीय! काय असावं बरं?

'रुही, तुला विचारतेय् मी. पियू कुठं गेलीय्?'

आता रुहीला वाटलं सांगूनच टाकावं. मग धीर गोळा करून ती म्हणाली,

'सुमामावशी, पियू घर सोडून निघून गेलीय्. परीक्षेलाही ती बसली नाहीय्.'

सुमाताईंना क्षणभर काही कळलंच नाही. रुही शुद्धीवर आहे ना? काय बोलतेय् ही? पियूबद्दल असं बोलावं, सांगावं तिनं? फोनमध्ये सुमाताईंचा आवाज जरा चिरकलाच. 'अगंऽऽ, चेष्टा कसली ही म्हणायची?'रुहीनं मग आईला हाकारलं. संगीताबाई थोड्या सावधपणं फोनवर आल्या. सावरण्याच्या हेतूनं सौम्य स्वरात म्हणाल्या, 'सुमाताई, सांभाळा स्वत:ला. प्रियांका खरंच पळून गेलीय्.' फोन कट् झाला. झाला म्हणजे काय; सुमाताईंनीच तो केला. त्यांना विचारावंसंही वाटलं नाही की पियू घर सोडून गेली म्हणजे नेमकी कुठं गेली? रुहीला सगळं सगळं माहीत असणारंच. मग अख्खी रात्र त्यांच्यावर कोसळत राहिली. संगीताबाईंनी न राहवून अनेकदा फोन लावला. सुमाताईंनी घेतलाच नाही. अखेर सकाळ होताच त्या स्वत:च सुमाताईंकडे आल्या. सुमाताईंनी दार उघडताच त्या आत घुसल्याच. रात्रभर सैरभैर, मुकाट बसलेल्या, उध्वस्त झालेल्या सुमाताईंकडं त्यांना बघवत नव्हतं. 'पोलीसांकडे तक्रार करायची का?-' विचारायचं म्हणून त्यांनी विचारलं. पण त्यांनाही माहीत होतं की त्याचा काहीच फायदा नाही. प्रियांका काही कोवळी बच्ची नाही. चांगली १८ वर्षांची आहे. जाणती आहे. त्यांच्या मनात आलं, प्रियांका कोवळी नाहीच; अन् करकरीतही नाही. रुही बरंच सांगायची ना त्यांना. खरं तर त्या दोघी शेजारी शेजारी होत्या म्हणूनच केवळ रुही पियूबरोबर जायची यायची. पण संगीताबाईंना ते अजिबातच रुचायचं नाही. शाळेत

जातानाचा तिचा रुबाब. जगातल्या सगळ्या गोष्टींची नको तेवढी माहिती. पुढं कॉलेजला गेल्यावर तिला मिळणारा भरमसाठ पॉकेटमनी. इतका की कसा खर्च करायचा; त्याचा प्रश्न पडावा! रुहीनं हे असं वागू नये यावर संगीताबाई कटाक्षानं लक्ष ठेवायच्या; तर सुमाताईंना हे सगळं मागासलेपणाचं वाटायचं. पार्ट्या, पोशाख, पी. जे. सगळंच 'प'च्या भाषेतलं अगदी 'पोटा'पर्यंत जिरणारं! मग पॉकेटमनीही पियूला अपुरा पडायचा. त्यावरही तिच्याबरोबर वावरणाऱ्या इतरांनी त्यांच्या समजुतीप्रमाणं 'रॉयल' मार्ग दाखवला! राजमार्ग? शी!! रुही पियूपासून दूर झाली ती या मार्गामुळंच.

सुमाताईंना वाटायचं, 'आपली पियू किती स्मार्ट! किती फॉरवर्ड! पार्ट्यांना जातेय्. आधुनिक भाषा बोलतेय्. सुंदर सुंदर ड्रेस घेतेय्.' त्यांना असा प्रश्न कधीच पडला नाही की, आपण दिलेल्या पॉकेटमनीत हे सारं बसणारं नाहीय्. मग येतो कुठून पैसा या सगळ्या खर्चासाठी? सुमाताईंना प्रश्न पडला नाही. त्यामुळं पियूलाही त्यांनी कधी प्रश्न विचारले नाहीत. रुही त्यांना मागासलेली वाटायची. पियू कशी स्मार्ट! पियू अक्षरशः वहावत गेली तरी सुमाताईंना कधी असं वाटलं नाही की आई म्हणून तिच्याबरोबर जावं कधीतरी. आपण दोघी एखाद्या नाटकसिनेमाला जाऊ; असं तिला सुचवावं. स्वतः बरोबर नाही गेलं समजा; ठीक आहे. पण असंही त्यांना वाटलं नाही की पियूच्या मित्रमैत्रिणींना घरी बोलवावं. पहावं तरी एकदा की तिचं मित्रकोंडाळं आहे तरी कसं? आपल्या इभ्रतीचं आहे की नाही? आपल्या संस्कारात बसणारं आहे की नाही? शेजारच्या रुहीचे कसे सगळे संगीताबाईंना माहिती होते. आपल्याला का माहीत नाही?... सुमाताईंना प्रश्नच पडले नाहीत.

त्यामुळं झालं काय; की पियू अन् त्या एका घरातल्या फक्त रात्रीपुरत्या पार्टनर्स झाल्या. मायलेक हे नाते फक्त पैशांच्या देवाणीघेवाणीपुरतं उरलं. घेवाण नाहीच. सुमाताईंनी फक्त द्यायचं. त्याच्या बदल्यात निदान भावनांची तरी घेवाण? ती तरी असावी की नाही? पण छे! ती नाहीच. मग रात्रीपुरत्याही त्या पार्टनर्स नाहीच उरल्या. पियू पायातले मोजेही रात्री काढेनाशी झाली. तळव्यांना सुया टोचलेल्या कळू नयेत म्हणून. ती नशेत आहे हेच जिथं सुमाताईंना कळत नव्हतं; तिथं तिच्या तळव्यांवरचे व्रण कुठून त्या पहायला? तिच्या अंगावरचे दागिनेही हळूहळू नाहीसे झाले. सुमाताईंना तेही कळलं नाही! आपल्या रुहीची मैत्रीण म्हणून संगीताबाई कधीतरी याबद्दल बोलण्याचा दुबळासा प्रयत्न करीत. 'रुहीबरोबर जाते येते पियू. पण जऽरा तिच्यावर लक्ष ठेवा हो. आई म्हणून कसं स्वस्थ बसवतं तुम्हाला?' त्याचा सुमाताईंना रागराग यायचा. वाटायचं, संगीताबाई मागासलेल्या जुनाऽऽट मताच्या आहेत. त्यांना काय कळतंय् यातलं? त्यांनी जुन्या पद्धतीनं वाढवावं आपल्या रुहीला. पियू बघा आमची म्हणता म्हणता जाईल कुठच्या कुठं.

अन् आता खरंच, पियू कुठच्या कुठंच गेली. राजकुमारबरोबर नाही गेली. रुहीला वाकुल्या दाखवत नाही गेली. सगळ्यांनी तिला हवं तसं ओरबाडलं. लुटलं. पैसे, दागिने, शरीर...सगळंच. सुमाताईंना यातलं काहीच कळलं नाही. उमगलं नाही. आता पारोश्या सकाळी त्यांच्या हेही लक्षात आलं नाही की आपल्याला भेटायला फक्त संगीताबाईच आल्यात. रुहीला सोबत न घेता. कारण त्यांना पियूच्या घराचा वाराही लागू द्यायचा नव्हता. बाकीच्या शेजारणीदेखील कळूनसवरून भेटायला आलेल्याच नाहीत. त्यांच्या हे देखील लक्षात आलं नाही की पियू त्यांना न सांगता पळून गेलीय्. हे तिनं फक्त रुहीला सांगीतलंय. आपल्याला नाही.

सुन्न बसलेल्या सुमाताईंना पियू अनोळखीच राहिली.पण अचानक भोवती पसरलेल्या उन्हात त्यांना लख्ख जाणवलं की आपल्यातली आईही आपल्याला अनोळखी राहिली आहे. खरं तर ही 'आई' त्यांना कधी भेटलीच नाही.

भोवती दिमाखदार संसार आहे. वैभवाची चिन्हं आहेत. मात्र त्या सुन्न सकाळी हे अनोळखीपण त्यांच्यात भरून राहिलंय.

आता ओळख होऊनही काय फायदा? पियू गेली. 'आई' रिक्त रिक्तच राहिली.

'आई' सुमाताईना कधी भेटलीच नाही. अनोळखीच राहिली.

# Ninety Years of Pathare Prabhu Directories (1864-1954)

**-Solicitor Rajan Jayakar**

Ordinarily Pathare Prabhu Directory is considered to be only a reference book, for finding the addresses for sending wedding and thread ceremony invitations. However, Pathare Prabhu Directories, over a period of ninety years gave so much data and information about various families that one could not only make a family tree for the last at least 100 to 150 years but also check more details about their ancestors.

It appears that the first directory called- ``Prabhu Rupee Calendar'' was published sometime in 1864 by Solicitor Balkrishna Kiritikar giving detailed information regarding each Prabhu family and also furnishing a list of all the charitable properties and Social and Benevolent Institutions belonging to the community. Due to the changes in the





THE

PRABHU

STREET AND MOFUSSIL

DIRECTORY.

1903-04.

*Containing a list of the Prabhu Gentlemen with [t]heir respective residences and Occupations and complete alphabetical Index.*

Bombay:

PRINTED AT THE "EXAMINER PRESS" FORT.

Price Rupee one.

Community by births, deaths and transfer of properties, the calendar had to be revised from time to time and brought upto date. However Mr. Balkrishna Kirtikar was unable to devote time due to his professional work and delegated the same to Mr. K. Raghunathji (author of Hindu Temples of Bombay, published in 1900) in the early 1870's. Incidentally, Solicitor Balkrishna Kirtikar took keen interest in the affairs of the Community from his early youth and after completing his college, he published ``Prabhu Intelligencer'', a magazine giving information of the current events in community and transfer of residence and occupations of the Community members. Publishers were hopeful of updating the directory every year. In 1887 new publishers took up the challenge of revising and improving the earlier directory including the occupation of adult male Prabhus and adding index in alphabetical order for easy reference. Due to vast number of casualties caused by the yearly visitation of plague epidemic and the consequent changes of residence by some of the community members the work of publishing further editions got delayed. Eventually the `Prabhu Street and Mofusil Directory (1903-04)'' was published on 1st December 1903. The publishers obviating several difficulties, made a compilation of particulars of inhabitants arranged according to their residences with their respective occupations. Owing to want of resources and apathy of some of the community members reluctant to give necessary information, certain mistakes crept into the publication, which the publishers undertook, to rectify on being brought to their notice. The 1903-04 Directory contained list of only Prabhu gentlemen with their respective residences and occupations and an alphabetical index for easy reference.

The index of the directory is very informative and spells out the localities where majority of Pathare Prabhus were located.


STREET DIRECTORY.

INDEX.

| | Page. |
|---|---|
| Agiary Road ... ... ... | 26 |
| Anant Rishi's Oart ... ... | 25 |
| Bandora ... ... ... | 47 |
| Beshem Hall Lane (Girgaum). | 1 |
| Bhai Jivanji Lane ... ... | 11 |
| Bhaskar Lane (G. P. C. Lane).... ... ... .. | 25 |
| Bhatwadi 1st Lane (Girgaum.) | 1 |
| Borebhat ... ... ... | 4 |
| Borebhat Cross Lane ... ... | 5 |
| Breach Candy ... ... ... | 44 |
| C. P. Tank Road ... ... | 38 |
| Chira Bazaar ... ... ... | 15 |
| Chawulwadi Cross Lane ... | 22 |
| Do. Main Road ... | 23 |
| Chowghar ... ... ... | 24 |
| Chowpati ... ... ... | 43 |
| Chunam Kiln Road ... ... | 43 |
| Cow Lane ... ... ... | 6 |
| Cumballa Hill .. ... ... | 43 |
| Dadar ... ... ... ... | 45,46 |
| Dhobitalao ... ... ... | 17 |
| Dhuswadi ... ... ... | 9 |
| Dukerwadi ... ... ... | 14 |
| Fanaswadi 1st Lane ... ... | 35 |
| Do. 2nd Lane ... ... | 32 |
| French Bridge ... ... ... | 43 |
| Gaiwadi ... ... ... ... | 16 |
| Girgaum ... ... ... | 4,6,7 |
| Do. near the P. Church ... | 2 |
| Girgaum Back Road ... ... | 42 |
| Hornby Road ... ... ... | 18 |
| Jambulwadi ... ... ... | 18 |
| Jakadwadi ... ... ... | 40 |
| Kalbadevi ... ... ... | 21 |
| Kanagally ... ... ... | 36 |
| Kandewadi ... ... ... | 41 |
| Do. Main Road ... ... | 3 |
| Do. Seral Lane ... ... | 40 |

| | Page. |
|---|---|
| Kenedy Bridge ... ... | 43 |
| Khatarali 1st Lane ... ... | 36 |
| Do. 2nd Lane ... ... | 37 |
| Khetwadi 1st Carpenter Street. | 39 |
| Do. 2nd Lane ... ... | 39 |
| Do. 3rd Lane .. ... | 39 |
| Do. Main Road ... ... | 39 |
| Do. 3rd Parsiwada ... | 39 |
| Khota's Oart ... ... ... | 42 |
| Kolbhatwadi ... ... ... | 21 |
| Kumbhartukda ... ... | 38 |
| Lady Jamsetji Road ... ... | 46 |
| Mahadeva Shett Lane ... | 17 |
| Mahalaxmi ... ... ... | 44 |
| Mahim ... ... ... ... | 47 |
| Mathew Road .. ... ... | 1 |
| Matunga ... ... ... | 46 |
| Moroba Pepatji's Oart ... | 20 |
| Mugbhat Bye Lane ... ... | 6 |
| Do. Main Road ... ... | 6 |
| Naigaum ... ... ... | 45 |
| Naviwadi ... ... ... | 27 |
| New Line Street ... ... | 18 |
| Nigdowdy Lane ... ... | 2 |
| Old Hanuman Lane ... ... | 23 |
| Pallow Road ... ... ... | 9,11 |
| Parel ... ... ... ... | 44 |
| Ramwadi ... .. ... | 24 |
| Remount Agent's Stables ... | 7 |
| Sadashiva Street ... ... | 41 |
| Tadwadi ... ... ... | 16 |
| Telwadi ... ... ... | 24 |
| Thakurdwar Road (T. Vaidya's Oart) ... ... ... | 8 |
| Thakurdwar Road ... | 8,9,37 |
| Vithalwadi ... ... ... | 24 |
| Warli .. ... ... ... | 44 |
| Zaoba's Oart ... ... ... | 11 |

First page of the Directory 1903-04


12

83 | 471 | Vamanrao Bapuji, Clerk, Hongkong Bank, and Son.
Ramrao Bapuji, Storekeeper, James Greaves Mill, and Son.
Mahadeva Bapuji, Student.
Shamrao Narayan, Merchant, and Sons.
Dashrathmandan Shamrao (See Aurangabad.)
Narayan Shamrao, Student.
84 | 469 | Janardan Vishvanath Kothare, Head Clerk, Translator's Office, High Court, and Sons.
Sonderrao Janardan, Clerk, Hongkong Bank.
Mukundrao Janardan, Student, G. M. College.
" | Vasantrao Lakshuman Dhaaadkar, Head Clerk, Common Prison, Bro., Sons and Nephew.
" | Dhakal alias Sadashiva Lakshuman, Head Clerk, Capt. Hardcastle, Marine Surveyor's Office, and Son.
85 | 467 | Nanu Narayan Kothare, J. P., Solicitor, Son and Grandson.
Raghunandan Nanu, B. A., Solicitor, and Son.
" | Anandrao Putuba Kothare, L. M. & S., and Son.
" | Lakshuman Balkrishna Nayak, B. A., Interpreter, Court of Small Causes, Bro. and Nephew.
" | Shamrao Balkrishna L. M. & S., and Son (See America)
" | Vinayak Anandrao Jayakar, Shipping Clerk, Nippon Yusen, Kaisha and Sons.
86 | 455 | Balkrishna Vasudeva Narayan Kirtikar, J. P., Solicitor, Bro. Sons, Nephews and Grandsons.
Bajirao Balkrishna, Cashier, Balkrishna V. N. Kirtikar Solicitor, and Son.
Anandrao Balkrishna, Clerk, Pol. Dept. Secretariat and Son.
Ramrao Balkrishna, (See No. 120).
Vamanrao Balkrishna, Insr. Clerk, Gaddum and Co.
Vasantrao Balkrishna, Partner, Kirtikar Bros.
Keshavrao Balkrishna, Partner, Kirtikar Bros.
Chandrasen Bajirao, Student.
" | Narayan Vasudeva, Clerk, Hongkong Bank, and Sons.
Sundarrao Narayan, Ledger-keeper, Hongkong Bank.
Vishvasrao Narayan, Partner, Kirtikar Bros.
" | Babul Ambarnath Rane, Son and Grandson.
Moreshvar Babul, Clerk, Wallace and Co., and Son.
87 | 441 | Vinayak Sadanand Kirtikar, Clerk, Court of Small Causes and Sons.
Moreshvar Vinayak, Clerk, B. I. S. N. Coy.'s Dock.
Gajanan Vinayak, Clerk, Bank of Bombay.
88 | 435 | Ganpatrao Moroji (Zaoba) Desai, Living on his property, Sons and Grandsons.
Moreshvar Ganpatrao (See No. 275a)
Madhavrao Ganpatrao and Sons. (See No. 98)
Balaram Ganpatrao, (See No. 14)
" | Narayan Moroji, (Zaoba) Desai Living on his property, Son and Grandsons.
Vasudeva Narayan, Manager, Surveyor to Register, and Sons.

Since it is also Mofusil Directory, meaning Prabhus living outside of Bombay, the names of Mofusils also makes interesting reading since some of the Prabhus occupied places of honour in the Indian Princely States. To illustrate the contents of the Directories, I have decided to refer to the members of my family. My grandfather Mr. Vinayak Anantrao Jayakar was a tenant of Solicitor Nanu Narayan Kothare at Indu Bhuvan, Thakurdwar. Accordingly his name is shown as Consecutive No. 85 and Tinplate No. 467 (as referred by the Publishers) at page 12. My grandfather was a clerk in a Japanese company called Nippon Yusan Kaisha and there is a mention of his sons. In 1903 my eldest uncle Gajanan, second uncle Nagesh and my father were minors.

During 10 years since the publication of last Directory in 1903, considerable changes had taken place in number and addresses of members of Community. The 1913 edition of the Directory assumed an enlarged form giving information about educational status and professions of male members of the Community and also added list of temples founded or managed by Prabhu gentlemen.

The Publishers of the Directory have mentioned in the foreward that the Community started waking up to the facts that the old habits born of wealth and luxurious living had to be curbed in the environment in the first decade of 20th Century. Although education was far more generally imparted than before, traders, though on small scale, surfaced in the Community. The fine arts such as painting and photography were on the rise and printing industry also attracted some of the community members. My family continued to remain tenants of Solicitor Nanu Narayan Kothare and since my uncle Gajanan was already a major his name is shown as student on page 19 of the Directory but my father Motiram, who was 14 years then, is not included, being a minor.



BOMBAY.

THE

PRABHU

STREET AND MOFUSSIL

DIRECTORY.

1913.

Bombay:

PRINTED AT THE "EXAMINER PRESS" FORT.

Price Rupee one.



19

190 471 *Bombay ... Shamrao Narayan Kothare, and Bros.* (See Aurangabad.)
Narayan Shamrao N. Kothare, Meter Inspector, Bombay E. S. and Tramway Co.
191 " Dhundiraj Moreshwar Ganpatrao Kothare, Student.
192 " Dinkar Lakshuman Dhabadkar.
193 469 Lakshuman Balkrishna Nayak, B. A., Chief Interpreter, Court of Small Causes, Bro. and Nephews.
Shamrao Balkrishna, L. M. & S., and Sons.
194 " Dhundiraj Ganpatrao Nagabhai Rane, Clerk, Acct. Dept. Bombay Municipality, Bros. and Nephew.
Balkrishna Ganpatrao, Student, St. Xavier's College.
Gajanan Moreshwar Ganpatrao, Student.
195 " Surendranath Krishnarao Vinayak Ranjit, Clerk, Atlas Assce. Co.
196 467 Nanu Narayan Kothare, J. P., Solicitor, Son and Grand Sons.
Raghunandan Nanu, B. A., Solicitor, and Sons.
Dilip Raghunandan, Student.
197 Indu Bhuvan Vinayak Anantrao Jayakar, Shipping Clerk, Nippon Yusen Kaisha, and Sons.
Gajanan Vinayak, Student.
198 459 Khanderao Moreshwar Dhakji Thakar and Bros.
Vithal Moreshwar, Student.
Chottu Moreshwar, Student.
199 455 Balkrishna Narayan Rao, Govt. Pensioner, Son and Grand Son.
Ganpatrao Balkrishna, Custom Clerk, J. Duxbury & Co., and Son.
Chandrakant Ganpatrao, Student.
200 " Narhar Kashinath Vithoba Kirtikar, Clerk, Audit Dept., G. I. P. Ry., V. T.
201 " Bhanushankar Nameeraj Talpade, Asst. Accountant, Paper Currency, and Son.
202 " Krishnarao Moreshwar Sadanand Ajinkya.
203 " Moreshwar Bapuji Ambarnath Rane, Clerk, Bombay Co., and Son.
204 435 Narayan Moroji Desai (Zaoba), Living on his property Son and Grand Sons.
Vasudeva Narayan, Manager, Capt. Erikson's Office, and Sons.
Raoji Vasudeva, Student.
Lakshuman Vasudeva, Student.
Vinayak Vasudeva, Student.
*Moreshwar Ganpatrao Moroji Desai (Zaoba), and Sons* (See No. 603).
*Madhavrao Ganpatrao and Bro.'s* (See No. 222).
205 " Anandrao Krishnarao Atmaram Talpade, Bailiff, Income Tax Office, and Bro.
Yeshvantrao Krishnarao, Student, Wilson College.
206 Vamanrao Janardan Vyavaharkar, Clerk, Ewart Latham & Co. and Son.
Anandrao Vamanrao, Student.

A separate list of Judges, Barristers, Advocates, Solicitors, Pleaders, fellows of Bombay University, Justices of peace, Doctors, Engineers, M.A.'s, B.A.'s Ph.D's and B. Sc.'s from the Community was attached to the Directory. Also a list of Benevolent, Literary and other community institutions was also attached. The endeavor of the publishers was to give maximum information and resultant benefit to the community members in the cost price of rupee one for the directory.

A separate Directory of all ladies of the community was the dream of Mrs. Pirojbai Agaskar. Pursuant to encouragement by Mr. Moreshwar Sadanand Desai, Mrs. Agaskar completed the manuscript of the Directory in 1919. However due to unavoidable reasons the same could not be published and Mrs. Agaskar revised the same upto 1st November 1921 before publishing it on 31st December 1921 in Marathi.




It is mentioned in the Directory that our community has 12 Suryavanshi and 15 Somvanshi kulas and it proceeds to give break up of status of all the ladies as per Kulas.

अनुक्रम नं० पाठारे प्रभु महिला. घर नं०

गिरगांव बॅक रोड. मुंबई नं. ४

७११ श्री० सोकरीबाई आनंदराव रामचंद्र बाळकृष्ण जयकर. १३०

गिरगांव रस्ता ( पहिली भटवाडी नाका ) मुंबई नं. ४

७१२ सौ० आनंदीबाई लक्ष्मणराव विनायकराव हरिश्चंद्र जयकर.

७१३ सौ० लक्ष्मीबाई वामनराव लक्ष्मणराव ,,

सँडहर्स्ट रस्ता ( मारवाडी विद्यालयाजवळ ) मुंबई नं. ४

७१४ श्री० पुतळाबाई विश्वासराव बाळाजी दिनाजी जयकर.

खेतवाडी ३ री गल्ली मुंबई नं. ७

७१५ सौ० तानीबाई वसंतराव रामचंद्र मोरोजी जयकर.

लॅमिंगटन रोड मुंबई नं. ७

७१६ श्री० अहिल्याबाई गणपतराव विनायकराव हरिश्चंद्र जयकर.

७१७ सौ० गंगूबाई मोतीराम गणपतराव ,,

७१८ कु० सोकरीबाई मोरेश्वर आनंदराव ,,

७१९ सौ० अहिल्याबाई विनायक आनंदराव ,,

( कन्या ) कु० चंद्रूबाई कु० कमळाबाई व कु० यमाबाई

माणिलाल मॅन्शन्स प्रिन्सेस सिनेमाजवळ लॅमिंगटन रोड मुंबई नं ७

७२० सौ० गिरीजाबाई शामराव लक्ष्मण विनायक जयकर.

( कन्या ) कु० प्रमिला व कु० येशो

नागा टेंपल लेन लॅमिंगटन रोड मुंबई नं. ७

७२१ सौ० रोमाबाई सुंदरराव गोपीनाथ जयकर. ३

( कन्या ) कु० मंजुळा

७२२ श्री० गोपिकाबाई शामराव काशीनाथ ,, २९

( कन्या ) कु० तानूबाई

७२३ कु० प्रमिला गजानन शामराव ,,

मॅथ्यु रोड ( सँडहर्स्ट पुलाजवळ ) मुंबई नं. ७

७२४ श्री० वेनूबाई दत्तात्रय रंगनाथ सदाशिव जयकर. २

७२५ सौ० कालिंदी मनमोहन रंगनाथ ,, ,,

( कन्या ) कु० येशी

७२६ श्री० जडावबाई सुंदरराव गजानन ,, ,,

७२७ सौ० चंद्रूबाई मोठाभाई सुंदरराव ,, ,,

( कन्या ) कु० लीलावती

[ २८ ]

A welcome change is that the advertisements of business firms of the community have appeared for the first time including, M/s. Dhairyawan Brothers (Merchant Insurance Agents), the Germaine Dyeing and Printing work, G. S. Trilokekar's photographic studios, Aryan Trading Agency (Hosiery & Tailoring), M/s. S. N. Talpade & Bros. (Sole Agents of Rex Chemical Works), D. Ball & Co. (Merchants and Agents) and M/s. K. T. Co. (General Retail Merchants.)

## पाठारे प्रभु ज्ञातीचें संख्याबळ.

| उपनांव | गोत्र. | सधवा. | विधवा. | कुमारिका. | सर्व स्त्रिया. | कुटुंबें. |
|---|---|---|---|---|---|---|
| **सूर्यवंशी कुळें.** | | | | | | |
| १ कोठारे | वसिष्ठ | १०१ | ६० | १७७ | ३३८ | १७७ |
| २ देसाई | मौनस्य | २७ | २३ | ५८ | १०८ | ५९ |
| ३ पुरंधर | वृद्धविष्णु | २९ | १७ | ३९ | ८५ | ५५ |
| ४ नवलकर | काश्यप | ५२ | २७ | ७९ | १५८ | ८९ |
| ५ नायक (दळवी) | कौंडिण्य | ३७ | १५ | २७ | ६९ | ३९ |
| ६ प्रधान | पूतमाक्ष | १० | ४ | १९ | ३३ | १८ |
| ७ [illegible] | ब्रह्मजनार्दन | ४ | ४ | ८ | १६ | ९ |
| ८ मानकर | मांडव्य | ३१ | १३ | ५७ | १०१ | ५५ |
| ९ राजे | भारद्वाज | ३३ | १२ | ५५ | १०० | ५१ |
| १० वेलकर | कौशिक | १४ | ५ | १२ | ३१ | २३ |
| ११ व्यवारकर | विश्वामित्र | १२ | १५ | १९ | ४६ | २९ |
| १२ पत्नेराव | हरित | ० | ० | ० | ० | ० |
| **सोमवंशी कुळें.** | | | | | | |
| १ अजिंक्य | मुद्गल | २९ | २० | ४६ | ८५ | ५२ |
| २ आनंदकर (वैद्य) | वैशंपायन | १ | ५ | १० | १६ | ७ |
| ३ कीर्तिकर | नानाभ्य | ५३ | १७ | ६३ | १५३ | ४३ |
| ४ गोरक्षकर | गौतम | २१ | ३ | ३३ | ५७ | ३८ |
| ५ जयकर | देवदत्त | ५२ | ३० | ७२ | १५४ | ९४ |
| ६ तळवदे (आगासकर) | जमदग्नि | ६४ | ४१ | १०४ | २०९ | ११३ |
| ७ त्रिलोकेकर | महेंद्र | २६ | २६ | ३१ | ८३ | ५४ |
| ८ धराधर | मार्तंड | २० | ११ | २७ | ५८ | ३३ |
| ९ धैर्यवान | चाणक्य | २३ | १२ | ४३ | ७८ | ३८ |
| १० प्रभाकर | बौलस्य | ५ | ९ | ८ | २२ | १४ |
| ११ रणजित | च्यवनभार्गव | ६ | ५ | ९ | २० | १४ |
| १२ राव | शांडिल्य | १७ | १३ | ३७ | ६७ | ३६ |
| १३ वाळकर | गार्ग्य | ११ | ७ | १६ | ३४ | २१ |
| १४ विजयकर | उपमन्यु | ३३ | २० | ६३ | ११६ | ६५ |
| १५ सेनजित | भार्गव | ७ | ६ | १७ | ३० | १६ |
| अज्ञात | | | १ | | १ | १ |
| | एकंदर संख्या | ६९८ | ४४१ | ११११ | २२५८ | १२३३ |

श्री.

# पाठारे प्रभु नामदर्शक गाईड.

ता. ३० एप्रिल १९२७.

**AN UP-TO-DATE AND HANDY**

# GUIDE

TO THE NAMES OF MEMBERS OF ALL

## PATHARE PRABHU

FAMILIES.

***30th April 1927.***

प्रकाशक.

भगवंतराव रघुनाथ आगासकर M. A. LL. B.

३८५ ठाकुरद्वार, मुंबई २.

मुद्रक.

पांडुरंग नारायण जव्हेरी

विनय प्रेस, ठाकुरद्वार, मुंबई.

Sometime prior to 1921. my family had purchased a residential building in Kiln lane off Lamington Road and my grandmother Smt. Ahilyabi Vinayak Jayakar being the eldest female member of the family is shown at page 28 along with my aunties, Champubai, Kamlabai and Yamabai.

Mr. Bhagwantrao Raghunath Agaskar published a directory on 30th April 1927 in Marathi which he called it `handy' and mentioned only the names and locality. Since my family was still at Lamington Road the names of all male family members above 12 years was mentioned on page 14 including the names of my uncles Gajanan, Nagesh, Keshav and my father Motiram.

By 1939 substantial population had moved to the northern part of Bombay Island i.e. Parel, Wadala, Naigaum, Dadar, Matunga, Mahim and Sion. Dr. Shivshankar Vinayak Harishchandra Navalkar with the help of Mr. Bhagwantrao Raghunath Agaskar thought it fit to bring out a separate directory on 31st July 1939 in Marathi, of community members residing in the Northern part of Bombay. For the first time the names of males and females were shown in one Directory. The publishers however specifically mentioned that females married outside the community and their children were not included in the Directory. Curiously there is a separate list, of land owners in the Northern part of Bombay, included in the Directory.

Finally a more comprehensive directory in



ॐ

उत्तर मुंबई बेट

पाठारे प्रभु

डिरेक्टरी.

३१ जुलै १९३९.

An up to date GUIDE
to
the names and addresses
of
all male and female members
of
PATHARE PRABHU FAMILIES
residing in the NORTH of BOMBAY ISLAND
( Parel-Wadala-Naigaum-Dadar-Matunga-Mahim-Sion. )

प्रकाशक:—

डॉ. शिवशंकर विनायकराव हरिश्चंद्र नवलकर, L. M. & S.

मुद्रक:—

पांडुरंग नारायण जव्हेरी.

English of males, females and minors was published by the Pathare Prabhu Charities under the Chairmanship of my father Mr. Motiram Vinayak Jayakar on 14th April 1954, mainly due to efforts of Mr. Motiram Atmaram Jayakar and a band of selfless volunteers such as Mrs. Kesharbai Madhukar Jayakar, Mr. Liladhar Yeshwantrao Kothare, Mr. Sumant Atmaram Mankar, Mr. Krishnakumar Navalkar and Mr. Vinayak Motiram Velkar and ably assisted for proof-reading and correction by Mr. Madhavrao Nanubhai Dhurandhar. The interesting part of the directory is that it contains some Ladies' songs, list of gotras, prarvars and patron goddesses and their location and a separate Index of males and females making reference easy. The forward sadly notes that the cohesion of our community has been disrupted due to economic condition of the community and community members are scattered to far flung suburbs. My family by 1954 had moved to 104, New Charni Road (subsequently known as Raja Rammohan Roy Road) opposite Harkisondas Hospital, Prarthana Samaj as reflected at page 70 and my name is shown as a minor.

In today's context the Community Directory



Opp: Harkisondas Hospital, Charni Road, Bombay.

JAYAKAR — Mr. Gajanan Vinayak A. / " Motiram -do- — Mrs. Akilyabai Vinayak A. / " Babibai Gajanan Vinayak / " Pramila Motiram -do- / Miss Kamlabai Vinayak A. / " Vasumati -do- / " Meenakshi Gajanan V. A. / " Miss Rajani -do-

Minors

Master Rajan Motiram V. / " Mohan -do- — Miss Mrudula Motiram V.

Khetwadi Main Road, Bombay.

MANKAR — Mr. Vasantrao Keshavji / " Deepak Vasantrao K. — Mrs. Malatibai Vasantrao K.

KOTHARE — " Laxmikant Vasudev K. — " Malati Laxmikant V.

Minors

Miss Shubhada -do-

22, Powalla Lane, 2nd Floor, Charni Road Junction, Bombay.

VIJAYAKAR — Mr. Arvind Prabhakar H. N. M. — Mrs. Chandrakala Arvind P. H.

Minors

Master Harinarayan Arvind P. / " Prakash -do-

KIRTIKAR / TALPADE — Mrs. Krishnabai Khanderao S. K. / " Kashibai Sunderrao A. N.

TALPADE — Mr. Kashavrao Shamrao R. / " Ramrao -do- — Mrs. Sarojini Ramrao S. R.

Minors

Master Pradeep Ramrao S. R. — Miss Sheela Ramrao S. R.

Powwalla Lane, Charni Road, Bombay.

JAYAKAR — Mr. Balmukund Sadashiv A. D. — Mrs. Champubai Sadashiv A. D. / " Ratnaprabha Nagesh S. A. / " Shobhana Balmukund S. A. / Miss Vinoda Nagesh S. A. D.

Minors

Miss Monica Balmukund S.

is a single act of bringing our community together, atleast on paper and past Directories are a great source of research material and the information could be useful for variety of reasons including heirship disputes, residential address at the time of publication of directory, occupation, old names of roads, and localities etc. particularly in the 19th century no other community, except Parsis, ever ventured into bringing out comprehensive community Directory. Every publisher during those 90 years felt that his task was more challenging than the earlier publishers. The community is doubtlessly indebted to the selfless work of some of its members, who sacrificed their valuable time, energy and probably their own money, for bonding the community by successively bringing our monumental research work in the form of Directories, initially charging only one rupee.

❑


बचाओ
फायर ब्रिगेड बुलाओ!
बचाऽऽव ऽऽ
मटण शॉप
चिकन सेंटर
मुक्या पक्षाला वाचवा
कबुतर को बचाव
आमचं काय?
प्रदीप कोठारे

# धनाची पेटी

## ❀ सुमन नवलकर ❀

''ए यश, अरे ऐकलंस का त्या नूरजहाँला तिळी नातवंड झालीत. आणि तिन्ही मुली झाल्यात्.''

'' काय म्हणतेस? नूरजहाँ म्हणजे आपली झाडूवाली ना? मग चांगली 'बुक' केली असती ना त्यातली एखादी सनीच्या मुलासाठी?''

''पण अजून तर सनीचंच लग्न होत नाहीये.''

''हो, पण सनीचं लग्न झालं असतं, आणि त्याला एखादा मुलगा असता, तर 'बुक' करून टाकली असती ना तिघींमधली एक? श्या!''

२०५० सालातली गोष्ट. सनी पंचवीस वर्षांचा झालाय. वधूसंशोधन सुरू झालंय. पण वधू मिळेल तर ना! पेपरात, नेटवर, मंडळांमध्ये-सगळीकडे नोंदणी केलीय. पण वधू मिळेल तर ना! सनीने बी.ई. आणि एम. बी. ए. केलंय. छान नोकरी, चांगलं व्यक्तिमत्व. पण वधू मिळणं मुश्किल. उपवर मुलीच नाहीयेत कुठेही. जेवढ्या काही आहेत तुरळक, त्या जन्मापासून 'बुक' झाल्यात. एकेकीला पाच-पाच जणांनी बुक केलंय. आता जेव्हा ती मुलगी लग्न करायचं ठरवेल, तेव्हा त्या पाचांमधून निवडेल एकाला. यश-यामिनीचं चुकलंच. मुलाच्या संगोपन-संवर्धनात ते इतके रमले होते, की बदलत्या समाजव्यवस्थेचं भानच राहिलं नाही त्यांना. आणि आता.... आता बराच उशीर झालाय. तब्बल पंचवीस वर्षांचा उशीर.

गाडीत महिलांच्या डब्यात, बसमध्ये स्त्रियां-साठीच्या राखीव बाकांवर, महिलामंडळांत, सगळीकडे साठ-सत्तर वर्षाच्या वरच्या महिला आहेत. वीस-बावीस वर्षांच्या मुली कुठेच दिसत नाहीत. 'महिला आरक्षण' फुकट चाललंय. मुलींच्या शाळांमध्येही मुलांना प्रवेश द्यायला सुरुवात केलीय, शिवाय पुरुष कर्मचारीही ठेवायला सुरुवात केलीय्. काय करणार? किती नुकसान सोसणार ते?

''आता सनीने प्रेमात तरी पडावं ना पटकन् कोणाच्या तरी आणि पटवून टाकावं.''

''अहो, बाईसाहेब, कायद्याने गुन्हा आहे बरं तो. एखादी पटवली आणि तीही पटली, तर तिला ज्या पाच जणांनी जन्मापासून 'बुक' केलं असेल, त्या प्रत्येकाला एकेक पेटी द्यावी लागेल आपल्याला. आणायचे कुठून इतके पैसे?''

''अरे, आपल्या चतुरालापण होती ना रे एक मुलगी? तीन मुलांवर झालेली?''

''चतुरा कोण? आपल्याकडे कामाला होती ती? मग सोडलं ना ग तिने काम?''

''हो, आता तिला गरजच काय कामाची? तिच्या मुलीने चांगला नेपियन सी रोडवरचा मुलगा निवडला ना? मुलाकडच्यांनी चतुराला राहायला जागा, हुंडा सगळं दिलं. मग चतुरा कशाला करणार आहे काम? शिवाय तिच्या तिन्ही मुलांसाठी तिने जन्मापासून 'बुक' केल्या होत्या पोरी. नशिबाने झाली तिघांचीही लग्न.''

''म्हणजे आपणच तेवढे मूर्ख मुलगी 'बुक' न करणारे''

''अरे, आपलं रेशनकार्ड नाही ना! तिने रेशनकार्डावरून नोंदली होती तिघांची नावं.''

''मग सनीसाठी करायचं तरी काय आता आपण? एखादी परित्यक्ता-घटस्फोटिता-''

''अरे बाबा, आहेस कुठल्या काळात? आजकाल परित्यक्ता, घटस्फोटिता फक्त शब्द राहिल्यात शब्दरूपाने. आणि एखादीचा नवरा गेला वर, तर तिला सुरुवातीला ज्या पाच जणांनी बुक केलं असेल ना, त्यातला एक गेला तरी राहिलेल्या चौघांपैकी एखादा पसंत करू शकते. त्या चौघांना सोडून तिने जर सनीशी

लग्न केलं, तर चौघे सनीवर करतील केस. मग सनी बसेल तुरुंगात खडी फोडत. त्यापेक्षा राहतोय सुखाने घरी.''

''सुखाने कसला? आतल्या आत झुरत असणार तो. हल्ली पाहिलंस? 'चारचौघी', 'मिळून साऱ्याजणी' असली मासिकं आणून वाचत असतो.''

''त्या मासिकांमध्ये तरी काय असतं हल्ली? सगळे म्हाताऱ्या बायकांचे फोटो, त्यांची माहिती, त्यांनी लिहिलेले लेख. सनीने पाहण्यासारखं काहीच नसतं त्यात. त्यापेक्षा सिनेमांच्या सिडी आणून पाहाव्यात.''

''अग, सिनेमात तरी हल्ली बायका कुठे असतात? अगदी बालगंधर्वांच्या काळात होतं तसं झालंय. आजी, आई, मुलगी, नात-सगळ्या भूमिका पुरुषच करतात हल्ली. बरं, जुने सिनेमे आणून पाहावे, तर सगळे पायरेटेड. ओरिजिनल मिळतातच कुठे? आणि मिळालेच तर त्यांचे भाव न परवडणारे.''

''मग आता रे? आपला सनी काय असाच राहणार?''

''अगदी राहीलच असंच काही नाही. एखादी आदिवासी पाड्यातली किंवा नेपाळ बांगलादेशमधून उच्चशिक्षणासाठी आपल्या देशात आलेली सनीने पटवली आणि गटवली तर होण्यासारखं आहे काहीतरी किंवा मग आपल्या पिढीतल्या एखाद्या बाईला आई-माई न समजत मैत्रीण समजून सनीने काही जगावेगळं जुळवलं तर होण्यासारखं आहे काही-बाही.''

''हो, अगदी काही-बाहीच बडबडतोस आहेस तू. आपला एकुलता एक लाडका लेक. आणि त्याच्याविषयी जराही नाही विवेक?''

''तेव्हा मी सांगत होतो, सनीला एखादी बहीण हवी म्हणून. निदान साटी-लोटी पद्धतीने तरी कोणाच्या मुलाला आपली मुलगी देऊन बदल्यात त्यांची मुलगी सनीसाठी मिळवू शकलो असतो आपण.''

''जर आणि तरचा आता काय उपयोग?''

''हे बघ, अजूनही वेळ गेलेली नाही. त्या नूरजहाँची एखादी नात सनीसाठी 'बुक' करूया. आणखी वीस वर्षांनी तरी सनीचं लग्न करू शकू आपण. पंचेचाळीस वर्षांचा असेल तो तेव्हा. अगदीच काही म्हातारा नसेल झालेला.''

''अरे, पण सनीलाही विचारयला हवं.''

''अग, सनी काय नाही म्हणणार आहे? एवढंच की आणखी वीस वर्ष थांबावं लागेल त्याला. शिवाय या वीस वर्षांत कुठली दुसरी मुलगी मिळू शकत असली, तरी एकदा का नूरजहाँच्या नातीला 'बुक' केलं त्याने, की बांधला जाईल तो. शिवाय नूरजहाँच्या प्रत्येक नातीला पाच-पाच जण 'बुक' करणार. त्यात सनीचा नंबर वीस वर्षांनी देखील लागेलच अशी खात्री नाहीच.

''काय त्रांगडं होऊन बसलंय रे हे?''

''अग, आपला समाजच कारणीभूत आहे त्याला. सगळ्यांना मुलगेच झाले. पहिला मुलगा झाला की मग दुसऱ्यांदा मुलीचा विचारच नाही. पहिली मुलगी झाली तर मात्र दुसऱ्या मुलाचा विचार करायचा. सोनोग्राफी करून पाहायची. मुलगी आहे कळलंच तर ॲबोर्ट करून टाकायची. आलीच मुलगी जन्माला, तर गळ्याला नख लावून मारून टाकायची. मग मुलींची संख्या घटत नाही जाणार, तर काय वाढत जाणार?''

''त्यामुळे झालंय काय, की हल्ली टी. व्ही. सिरियल्स, फॅशन शोज पाहिलेस ना? बघवत नाही अगदी. सगळीकडे आपले स्त्रीच्या वेषातले पुरुष आणि त्या 'मिस इंडिया' स्पर्धा व्हायच्या पूर्वी, आठवतं?- त्याही हल्ली बंद पडल्यात, पाहिलंस? अरे, भाग घेण्यासाठी मुलीच अस्तित्वात नाहीत, तर भाग तरी कोण घेणार? हल्ली ड्रेस डिझायरनचे कोर्स पण बंद पडत चाललेत. आणि विमानात पण 'एअरहोस्ट'च असतात 'फ्लाईटपर्सर'च्या जोडीला.

''हल्ली छान-छान साड्यापण मिळणं मुश्किल झालंय. पैठणी वगैरे बनवणं बंदच केलंय कारागिरांनी. कापडं आपली मिळतायत. घ्या ताग्यातून कापून आणि शिवा पाहिजे ते. काही दिवसांनी तर देवीच्या ओटीसाठीही साडी मिळायची नाही बाजारात.''

''अग, हे असंच चालू राहिलं, तर स्त्री कशी होती हे पाहायसाठी देवळातली देवीची मूर्ती किंवा अजिंठा-वेरूळची कोरीव लेणी जाऊन पाहावी लागतील.''

''तुला सांगू? मला तर ना, हल्ली रस्त्याने जाताना घाबरायलाच होतं. पुरुषांच्या जोडीला, तरुण-तरुण मुलंही माझ्यासारख्या बाईकडे टकामका पाहत राहतात. बाई कधी न पाहिल्यासारखे. पूर्वीपासून स्त्रियांवर वाईट प्रसंग येत राहिलेत. पण आता ज्या काय थोड्या फार राहिल्यात ना स्त्रिया, त्यांच्यावर येणाऱ्या वाईट प्रसंगांची संख्या वाढणार आहे. पाच पांडवांमध्ये एक द्रौपदीचा काळच काय, पण शंभर कौरवांमागे एक स्त्री असण्याचा काळही मागे पडणार आहे, असंच चालू राहिलं तर.''

''पंतप्रधान, राष्ट्रपती स्त्रिया असायच्या आपल्या देशात. पण आता बघतेस ना, झाडूवाल्या, मोलकरणी अशा ज्या प्रांतात स्त्रियांची 'मोनोपोली' होती; तिथेही पुरुषांची मक्तेदारी होत चाललीय. आता आपल्याकडे ती नूरजहाँ वर्षानुवर्षांची आहे म्हणून.''

''पण आता आपल्या सनीचं रे? मला तर खूपच काळजी वाटायला लागलीय त्याची.''

तेवढ्यात दरवाजाची घंटी वाजली. सेल्समेन! हो सेल्सगर्ल्सचा जमाना गेल्यातच जमा!

''घरात कोणी बाईमाणूस आहे का?''

''हो, मीच, काय हवंय?''

''नाही, तरुण बाई आहे का कोणी? मुलगी वगैरे?''

''काय वेड लागलंय? आम्हालाच हवीय, तर मिळत नाहीये. पण तुम्हाला कशाला हवीय?''

''नाही, मी मुलींसाठीच्या काही वस्तू आणल्यात. खोटे दागिने, प्रसाधनं, केसांच्या क्लिप्स, मेंदीची पाकिटं. अगदी एकावर एक फुकट आहे हो.''

''एकावर दोन फुकट दिलंत तरी नको. वापरणारंच कोणी नाही. मग घेऊन काय करू?''

''मी पण आता आहे तेवढाच माल संपवणार आहे. मग काही दुसरं विकावं म्हणतो. कोणी म्हणजे कोणी घेत नाही हो. माल जुना होत चाललाय.''

''प्रसाधनं जुनी झाली तर वाया जातील. पण केसांच्या क्लिप्स, पिन्स, दुसऱ्या वस्तू 'अॅन्टीक पीस' म्हणून चालतील काही दिवसांनी, म्युझियममध्ये ठेवण्यासाठी.''

''काय म्हणताय? मग आता प्रसाधनं तेवढीच विकतो. बाकी माल ठेवतो तसाच. जरा पाणी देता का प्यायला?''

''यश, जरा यांना पाणी दे रे. डिस्पोजोबल ग्लासातच दे हं का पाणी. परत आणि ग्लास धुवायला नको.''

-सेल्समन गेल्यावर यश-यामिनी पुन्हा सनीच्या मुद्यावर येणार तेवढ्यात सनी आला. आल्या-आल्या सरळ जाऊन लॅपटॉपच घेऊन बसला. 'शादीड़ॉट कॉम' लावून.

''आई-बाबी लवकर या'' दोघे सनीच्या खोलीत धावले.

किती दिवसांनी आज भाग्याचा दिवस उजाडला म्हणायचा. साईटवर चक्क डॉली नावाची कोणी मुलगी सापडली सनीला. चक्क लग्न करण्यासाठी मोंबासाहून येतेय. लग्न करून परत मोंबासाला जाणाराय. मुळातली भारतीयच. पण तिथे गेल्या कित्येक पिढ्या स्थायिक झालेत ते लोक. सनी तर चक्क खुश झालाय.

-मग मुलगी पाहिली. पसंत पडणारच होती. मुख्य म्हणजे डॉलीला सनी पसंत पडला. लग्न ठरलं. दोन्हीकडाचा खर्च अर्थातच यश-यामिनी करणारेत. सनीला हुंडा म्हणून त्याचा लॅपटॉप, त्याची गाडी, मोंबासातल्या बिऱ्हाडासाठीचे पैसे आणि तिथे त्याला नोकरी मिळेपर्यंतचा सनीचा खर्च यश-यामिनी देणारेत. मुलगी मिळतेय हीच मोठी पर्वणी.

सनीचं लग्न धूमधडाक्यात झालं. सनीची पाठवणी करताना यश-यामिनीला रडू कोसळलं. पण सनीच्या सुखात सुख मानून दोघांनी मन घट्ट केलं. एवढी मोंबासातली मुलगी. पण निघताना डॉली चक्क पाया पडली. यश-यामिनीच्या टी. व्ही.च्या छायाचित्रकारांनी हा क्षण टिपून आपापल्या वाहिन्यांवर दाखवला.

'अष्टकन्या सौभाग्यवती भव' यश-यामिनीने तोंड भरून आशीर्वाद दिला. कलियुगातलाच आशीर्वाद तो. खरा होण्याची शक्यता जवळजवळ नाहीच. पण समजा झालाच आशीर्वाद खरा, तर मग सनीला नोकरीची गरजच भासणार नाही.

आठ बेट्या म्हणजे धनाच्या आठ पेट्या, ;कसं?

❏

# बिऱ्हाड निघाले पूर्वेला

❀ उदय जयकर ❀

(अर्धसत्य, काही असत्य, तर जास्त काल्पनिक प्रसंगांवर आधारित कथेत कुणास व्यक्ती, प्रसंग आदीत साम्य वाटल्यास तो योगायोगाच आहे...उदय जयकर)

बरेच दिवस झाले किशोर काही भेटला नाही की त्याचा फोनही नाही. तसे माझे येणे जाणे कमीच झाले होते. एक तर लग्नाची घरात गडबड. तर शाळांच्या सुट्टीमुळे नातू घरीच. तेव्हा घरबसल्या करमणूक म्हणून घराबाहेर पडण्यास वेळ कमीच. किशोर हा माझा वर्गमित्र म्हणण्यापेक्षा 'बाकडे मित्र' म्हणणे उचित ठरेल. कारण ६ वी अ ते ११ वी अ हा प्रवास वर्गातील कोपऱ्यातल्या बाकावर एकत्र बसून केला. एवढेच नव्हे; तर मास्तर/बाईंनी केलेल्या शिक्षाही एकत्रच भोगल्या. पुढे शिक्षण व नोकरीने वेगळ्या मार्गाने चालत होतो. तरीही दादर टी. टी.ला अधून मधून भेट होत असे. बोटीवर असल्याने परदेशातल्या गमतीजमती तो मला सांगत असे व नोकरीतून मला झालेल्या भारत दर्शनाच्या गोष्टी मी त्याला. टी. टी.ला असलेल्या अनेक इराणी हॉटेलांपैकी याझदानचा बुरूनमस्का व चहावर रंगत असे. आता इराणी गेले उडपी आले व आम्ही दोघेही वरिष्ठ नागरीक झालो.

असा हा ६५ वर्षांचा किशोर, त्याची भेट झाली नाही म्हणून एक दिवस मोर्चा त्याच्या हिंदु कॉलनीतील पहिल्या गल्लीतील घराकडे वळविला. हिंदू कॉलनीतील संस्कृती, किंग जॉर्जची शिस्त ह्या साच्यातून निघालेला किशोर सौ., मोठा मुलगा, सून व नातीसह राहतो. बेल वाजल्यावर दारात पदर खोचलेल्या वहिनी उभ्या. पदर सावरत वहिनींनी तोंडावर पदर फिरवीत स्वागत केले. ''बरं झालं बाई तुम्ही आलात ते.'' म्हणत सोफ्यावर बसण्यास सांगितले. तेवढ्यात आतून किशोर आला. एकंदरीत रंग पाहून बिऱ्हाड बाहेरून आले तरी असावे किंवा निघाले असावे असे वाटत होते. तेवढ्यात वहिनीने फर्मान सोडले ''अहो, आताच त्याची भेटवस्तू देऊन ठेवा. नाहीतर तुम्ही विसराल.'' ''पण माझाच मित्र तो. घेऊन जायला विसरला तर?'' किशोरने दोघांचाही विसराळू स्वभाव चव्हाट्यावर मांडला. पुठ्ठ्याच्या डबीतून 'मरलायन'ची काचेची मूर्ती हातात ठेवली. वहिनींना म्हटलं ''काय वहिनी 'व्हॉयेज'चा'' सांगता की पुनरावृत्ती?'' ''कसले हो भावोजी? हा मनू माथीच बसला अगदी.'' 'वसुधा शास्त्री'च्या स्टाईलने वहिनीने पदर तोंडाला लावला. मनू ५/६ वर्षाचा असेल तेव्हा किशोर वहिनींना 'व्हायेज'वर घेऊन गेला असताना मनूची आठवण येते म्हणून वहिनी पहिल्या पोर्ट ऑफ कॉलवरून विमानाने परतल्या होत्या. आतापर्यंत जेट लॅगची झोप काढून नात अनन्या आजोबांच्या मांडीवर डोके ठेवून आळोखे पिळोखे घेत होती.

'अरे झालं काय; एक दिवस मनू ऑफिसातून परत आला व म्हणाला, ''मी आपले सर्वांचे मलेशिया सिंगापूरचे बुकींग करून आलोय. तुम्ही दोघांच्या पासपोर्टचे जे काही षोडोपचार करायचे आहे ते लवकर उरका. महिना अखेरीस निघायचे आहे. शारदाने अरे पण मनू... सूर काढताच गेलो तर पाचजण; नाहीतर कोणी नाही. गोव्याला पण हेच नाटक केलेत आणि आला नाहीत. सर्व मार्ग बंद झाल्याने सर्वांनी पूर्वेच्या प्रवासाच्या तयारीचा निश्चय केला. मध्येच विशाखाला आठवले. सासूबाईंना एस्कलेटरची भीती वाटते. शारदेच्या हुरुपाला खिंडार पडले.'' चहा व बिस्किटे आली तरी

किशोरच्या कथाकथनाला खीळ बसली नाही. आईच्या समस्येवर मनूने तोडगा काढला. ''तिला घेऊन रानडे रोडवरच्या मॉलमध्ये जा. दोन दिवसात सवय होईल.'' शारदा आणखी चिंतीत झाली. त्यात आजी आधीच काचेच्या लिफ्टला घाबरते. इथे तर ओपन म्हणताना आजीच्या तोंडचे पाणीच पळवले. मी तिला समजवले. लिफ्ट व एस्कलेटरची सवय करून घेण्याशिवाय गत्यंतरच नाही. बाई तयार झाली. एक दिवस आम्ही सर्वजण एका मॉलमध्ये गेलो. तिला जोडीने घेऊन एक, दोन, तीन करत चढलो. शारदेचा अपेक्षेप्रमाणे तोल गेला. मागून मी तिला सावरले. पण वर पोहोचल्यावर बाई बिथरलेल्या दिसल्या. मी म्हटले, किशोर चा...चाहटळपणा अजून गेला नाही तुझा. ''नाही हो, ह्यांनी सावरले मला. पण त्यात ह्यांचाही तोल गेला असता तर? ह्या भीतीने मी भेदरले हो. असे म्हणत शारदावहिनींनी आमच्या होऊ घातलेल्या चाहटळगिरीला आवर घातला. ''पण काय सांगू उदय, आजी व नातीचे गुप्तगूं चालू राहिले.'' पुढील काही दिवस नातीचा हात धरून आजी सरकत्या पायऱ्या (वहिनींच्या शब्दांत) सर करत निघाली.

एकदाची ती संध्याकाळ उजाडली व सहकुटुंब मी सहार एअरपोर्टला टूर संचालकाची भेट घेतली व २०/२५ जणांच्या घोळक्यात आम्ही शामील झालो. नाही म्हणायला हिच्या जोडीच्या दोन, तीन आज्या होत्या. 'तुझे बरे लक्ष आज्यांकडे' वहिनीची बाजू घेत म्हटले. तसे नाही रे; मध्यंतरीच्या काळात कल्पना ठाण्याहून आपल्या परमपूज्य आईसाठी तीन पंजाबी ड्रेसेस घेऊन आली. टूरवर पटापटा चालायचे असते. तेव्हा पंजाबी ड्रेस बरा पडतो. लेकीने आणलेले कपडे पटकन घालून कौतुक करायचे सोडून माता कुरकुरत बसली. रेडीमेड आहे तेव्हा घालून बघ, ह्या कल्पनाच्या तगाद्यापुढे नमून एक ड्रेस घालून शारदा आली. लेक व सूनेने ''वाहवा, छान फिटिंग झालेय'' म्हणून कौतुक केले; हं, धान्याने भरलेली गोण म्हटल्यावर तुझी वहिनी फुरगाटली. पण खरी मजा; ती अनन्याच लाजेने डोळे बंद करून बसली होती. तेव्हा विमानाच्या प्रवासाला शारदाने पंजाबी घातला होता तशाच त्या आज्याही पंजाबी घालून होत्या रे. गोव्याला विमानाने जाऊन आलेल्या अनन्याने विमान प्रवासात आजीच्या बरोबर बसून विमानाच्या उड्डाणाबाबतीत आजीचे डोके खाल्ले. पण येताजाता आजीला न्याहाळून घेत होती पंजाबी ड्रेसमध्ये . ५-६ तासांचा प्रवास संपवून विमान कुआलालंम्पूरला उतरले. बसने शहरातील एका हॉटेलच्या व्हॉल्टमध्ये सामान ठेवून प्रत्येकी दोन जोडी कपडे व गरम कपडे लहान बॅगेत घेऊन जेटींगकडे निघालो. मुंबईत चढवलेले खोगीर, दिवस पालटून गेला तरी बदलायला न मिळाल्याने व त्यात तो पंजाबी सूट असल्याने शारदा जरा जास्तच कासावीस झाली होती. त्यातून तिला बाहेर काढण्यासाठी मी शहराचे कौतुक करत होतो तर रस्ते खाचखळग्याविना आहेत. पावसाळी हवा मुंबईसारखीच वाटते म्हटल्यावर, ''अहो निघताना स्वैंपाकघराची खिडकी नीट बंद केलीत की नाही?'' असा प्रश्न करून शारदा मनाने हिंदु कॉलनीच्या पहिल्या गल्लीत पोहोचली. तेवढ्यात आमची गाईड समोर दिसत असलेल्या 'बातू केव्ह'ची दंतकथा सांगू लागली व शारदा बसमध्ये परतली. काय समजलंस उदय, तुझी वहिनी पार्वतीवहिनीसारखीच कधी मुंबई तर कधी आमच्यासोबत टूर वरीत असे. उदय म्हणजे तुला 'दीनानाथ शास्त्री' म्हणायचे नाही. तरीपण बघता बघता आम्ही जेटींगच्या पायथ्याशी पोहोचलो आणि सरळ वर चढणारी केबल कार बघून आम्ही सर्वचजण काही क्षण थक्क झालो. पण एकदा हळू सरकरणाऱ्या केबल कारमध्ये बसलो व ती दाट धुके व घनदाट जंगलातून जेंन्टींगच्या दिशेने झेपावू लागली तेव्हा आदल्या दिवशी संध्याकाळी ६ वाजता दादरहून सुरू झालेल्या २०/२२ तासांच्या प्रवासाचा शीण गायबच झाला. अनन्या तर धुक्याला कवटाळू इच्छित होती.'' हे सर्व सांगताना किशोरचा चेहरा एका निराळ्या आनंदाने चमकत होता.

महिनोन्‌महिने समुद्राचे पाणी पाहत जगणारा किशोर आज हरीतसृष्टी बघत होता; हे एकच कारण नव्हते. तर जोडीला सुपुत्राचे कुटुंबही होते ना!

‘‘जेन्टींगच्या हॉटेलातील खोली गाठली काय; शारदाने आपली कातच टाकली होती. आंघोळ मासोळ उरकून साडी नेसून आली. मी आपला कोटबूट घालून बांद्र्याचा सायबा झालो व आम्ही खाली उतरलो. दिव्याच्या झगमगात उजळलेले अम्युजमेंट पार्क व मार्केटात भटकलो. पुढचे दोन दिवस राईडस्वर मुलांनी यथेच्छा मजा केली. तर आम्ही वरिष्ठ नागरीकांनी सृष्टी सौंदर्य व हवेचा भरपूर आस्वाद घेतला. तेथून निघेपर्यंत तुला सांगतो उदय शारदाची एस्कलेटरची भीती गायब झाली होती. ७/

## विचारांची भेळ

भय्या तुझ्या गाडी आलो
भेळ पुरी खाया
आलू अन् कांद्यावरी
माझी असे माया
नको जैन भेळ करू
जाईल तिची रया ।।भय्या, भय्या तुझ्या

मेहनतीला देव मानून
भेळ देसी खाया
कसे सांगू सोड मुंबई
लावलीस तू माया
मन आनंदून नाचे
गुण तुझे गाया ।। भय्या, भय्या तुझ्या

आमच्या मुलांना हवी
श्रमाविना माया
मेहनतीशिवाय धंदा
जणू, सूर्याविना छाया
नोकरीच्या विचारात
जाई वेळ वाया ।। भय्या, भय्या् तुझ्या

**-अजित प्रमोद तळपदे**

७.३० ला नास्तापाणी करून केबल कारने जेन्टींगच्या पायथ्याशी पोहोचलो व बसने कुआलालम्पुरला निघालो. रस्त्यात शारदा म्हणाली, ‘अहो, एक गोष्ट तुमच्या लक्षात आली का? ह्या सर्व बसेस आपल्या ‘शिवनेरी’ सारख्याच आहेत ते?’ ‘हो ना तेवढेच काय हा रस्ता तर मुंबई-पुणे एक्सप्रेस वे आहे.’ मी उत्तर दिले. तसे मुंबई-पुण्याकडच्या सहप्रवाशांना काही राईडस् वगळता नाविन्य नव्हते. पण महाराष्ट्रातील इतर शहरातील लोकांना सर्वच काही नवीनच होते.

रस्त्यात परत ‘बातू केव्ह’ लागली. ह्यावेळी बस थांबली तिच्या पायथ्याशी. येथे गुंफेत जाण्याकरता शेकडो पायऱ्या चढाव्या लागतात म्हणून आमच्या सारख्यांनी खाली तामीळ देवळात दर्शन घेऊन मद्राशी मेदूवडा वगैरे खाल्ले. बऱ्याच वर्षाने फिल्टर कॉफी (अस्सल हं) प्यालो. उदय, रुईयाच्या ‘राम रेस्टॉरंट’ची आठवण झाली. आता परत कधी भेटलो आपण; तर रुईयाला बसू या. ‘रुईयाच्या बाहेर बसायचे दिवस गेलेत तुमचे.’ आत बाहेर करणाऱ्या वहिनीने टोमणा मारला. कुआलालंम्पूर शहर व आजुबाजूच्या ऐतिहासिक स्थळांना भेट देत देत संध्याकाळी काळोख होण्याआधी कम्युनिकेशन टॉवरला पोहोचलो.

‘अहो भावोजी। मी व हे खालीच बसून राहिलो. अहो, त्यातली लिफ्ट म्हणे ६० सेकंटात २५०/२७५ फूट उंचीवर व्युव्हरर्स गॅलरीत घेऊन जाते. पण काळोखल्यावर आम्ही परत पुन्हा ‘व्टीन टॉवर्स’च्या चौकात आलो. तसे भर दुपारीपण ते टॉवर्स पाहिले होते. पण रात्र झाली आणि त्या स्टेनलेस स्टील व काचांनी आकार दिलेल्या इमारतींवर जांभळ्या गुलाबी प्रकाश झोतात नजारा काही निराळाच होता. वळून मागे बघितले तो दुसरा टॉवर निळ्या लुकलुकत्या दिव्याने संपूर्ण सजलेला व मधूनच चमचमते तारे. पाय निघत नव्हता तिथून.’ वहिनींनी आवराआवरीतून वेळ काढून आपला आनंद व्यक्त केला. त्यानंतर आम्ही मलेशियाची सरकारी वसाहत,

पुत्रजया वगैरे उरकून तिसऱ्या दिवशी सकाळी सिंगापूरला प्रस्थान केले. 'तुम्हाला सांगते भावोजी, स्वच्छतेत मलेशिया, सिंगापूर तोडीस तोड म्हटले तरी हरकत नाही. पण मी मात्र सिंगापूरच्या प्रेमातच पडले. सबंध प्रवासात मी हाच विचार करत असे की निव्वळ स्वच्छता भारतवासियांनी पाळली तर किती बरे होईल. मी अनेकवेळा विचार करत असे; स्वच्छ हिंदु कॉलनी, सायन ते लालबाग, आंबेडकर रोड कसा दिसेल? 'हे चालले होते काय? मला वाटायचे तू शुभ्रा शास्त्री/पार्वतीवहिनी होत असे की काय?' किशोरने मध्येच बॉम्ब टाकला. 'तुमचे चालू द्यात वहिनी,' मी म्हटले. ''तशी सिंगापूरच्या त्या अती जायंट व्हीलमध्ये बसायला मी कचरलेच होते. पण प्रत्यक्ष त्या ठिकाणी गेल्यावर भीती नाहीशी झाली. नाईट सफारीचा तो अनोखाच अनुभव. 'सतोंसा' बेटावर तर सकाळपासून रात्रीपर्यंत वेळ कसा गेला कळलेच नाही.'' 'हं त्या ४डी शोमध्ये काका एक माणूस आणि तिची आजी स्टॅच्यू होऊन बसले होते.' आता मनू पण आमच्या जोडीला बसला होता. त्याच्या ह्या बोलण्याने लाजून अनन्याने आतली खोली गाठली. नाही हो भावोजी त्या चिंबोऱ्या पायावर चढल्यासारखे वाटत होते, तर फुलपाखरे, मानेवर कानाभोवती फडफडल्याचा भास होत होता. पण त्या चाच्यांपैकी एकजण पाणी थुंकतो ते आपल्या तोंडावर, हे जरा जास्तच होते. पण मज्जा आली. संध्याकाळी समुद्राकाठी एक 'साँगस ऑफ सी' लेझर शो होता. अगदी अप्रतिम. अगदी डोळ्याचे पारणे फेडणारा.''

आम्हा दोघा मित्रांच्या जोडीला हळुहळू कुटुंबातले सदस्य येऊन बसू लागले तेव्हा म्हटले ह्याची आवराआवरी आटोपलेली दिसतेय. आपण आता निरोप घेऊ या, म्हणून उठता उठता किशोर व वहिनींना म्हटले, 'देवाचे आभार माना. पोटी अशी गुणी बाळं दिली.' 'हो भावोजी नाहीतर काय कोठे एकटे जाणे शक्यच नाही हो.' माझी भेटवस्तू घेत किशोरच्या कुटुंबाचा निरोप घेतला.

❏

# निसर्ग जेव्हा

डोंगराच्या भृकूटीमधे
जेव्हा चंद्रकोर सजते
तेव्हा मनात चांदणे हसते

हिरव्या नदीला
जिथे नीळा सागर कवटाळतो
तिथे मनात मोर नाचतो

सोन हिरव्या पानावर
ओला मोती चमचमतो
तेव्हा मनात श्रावण फुलतो

उमलत्या गंधीत पाकळ्यांवर
फुलपाखरू गुंजारवतो
तेव्हा मनात श्रृंगार फुलारतो

उंच नभाच्या गाभ्यात
इवला पक्षी भरारतो
तेव्हा मनात हर्ष थरारतो

उटी चर्चित नभाळावर
रक्त टिळा उगवतो
तेव्हा मनात आशा किरण जागतो

तान्हुल्या दुधाळ ओठांवर
द्वाड स्मित उमलते
तेव्हा मनात माया आनंदते

शुष्क निबर खोडातून
हिरवे कोंब डोकावते
तेव्हा मनात दुःख हसते

संपूर्ण चराचरातून
जेव्हा निसर्ग हसतो
तेव्हा मनात देव पालवतो

**-तेजस्विनी मानकर**

# सुंदर माझं घर

## ❀ नंदकुमार कृ. विजयकर ❀

'सुंदर माझं घर' या चित्रपटाची जाहिरात आणि प्रोमोज पाहून उत्सुकता वाढली होती. चित्रपट पाहायचा हे तेव्हाच ठरवलं होतं. पण या चित्रपटावरील परीक्षण वाचलं, 'फक्त घर सुंदरआहे' बाकी चित्रपट सुमार आहे हे कळल्यावर सगळा उत्साह मावळला. तसं पाहिलं तर प्रमोद प्रभुलकरांचा



'गणप्या गावडे' हा चित्रपट मी पाहिला होता. या तरुण लेखक/ दिग्दर्शकाकडून मोठ्या अपेक्षा आहेत. पण त्याच्या हातून फारसा चांगला चित्रपट निघू नये हे जाणून मोठं आश्चर्य वाटलं. तरीही मी चित्रपट पाहिला आणि या निष्कर्षाप्रत आलो की, छापून आलेल्या समीक्षेवर अवलंबून न राहता सामान्य रसिकांनी चित्रपट पाहावा व आपलं मत बनवावं.

'सुंदर माझं घर' एक नितांत सुंदर चित्रपट आहे. आजच्या विनोदी चित्रपटांच्या लाटेमध्ये याचं वेगळेपण उठून दिसतं. कोकणातील एका खेड्यातील पंधरा-वीस माणसांच्या भरल्या घरातून पालवी लग्नानंतर मुंबईत येते. मुंबईला आलिशान फ्लॅटमध्ये पालवी आणि तिचा नवरा फक्त दोघेच. सासू-सासरे दुसरीकडे राहतात. नणंदेने प्रेमविवाह केल्याने घरच्यांनी तिच्याशी संबंध तोडलेले असतात. एकूण सर्व कुटुंबच विखुरलेलं. त्यांच्यात कौटुंबीक वाद आणि मनाने, शरीराने दुरावलेली ही माणसं. या सर्व वातावरणात पालवीची घुसमट होते. मोठ्या कुटुंबात राहणारी पालवी, सासरच्या सर्व माणसांना एकत्र आणण्याचा निश्चय करते. त्यासाठी ती 'आदर्श सासू-सून' ह्या 'रिॲलिटी शो'ची योजना आखते व त्यायोगे सर्व कुटुंबाला एकत्र आणण्यात यश मिळवते. नेहमीच्या कौटुंबीक कथांच्या साच्यात न बसणारी ही कथा आहे. म्हणूनच हा चित्रपट सुंदर बनला आहे.

चित्रपटाच्या पूर्वार्धात आपण पालवीच्या पूर्वायुष्यात डोकावतो. कोकणच्या निसर्गरम्य अशा पार्श्वभूमीवर चित्रपटाची सुरुवात होते. खडकावर आपटणाऱ्या फेसाळत्या लाटा, पांढऱ्या मऊशार वाळूचा किनारा, नारळी-पोफळीच्या बागा, त्यातून वळण घेत जाणाऱ्या निमुलत्या वाटा. त्या वाटांवरून सायकली घेऊन पळणारी पालवीची मित्रमंडळी. एकूण पाचूच्या रानातील सर्व हिरवाई लेवून एक आश्वासक सुरुवात होते. आपण पालवीच्या घरात येतो. आजी, आई, वडील, काका, काकू आणि सर्व भावंडं मिळून एका सुंदर परिवारात आपण काही काळ वावरतो. या एकत्र कुटुंबात होणारे काही रुसवे-फुगवे, काही वाद, लहान मुलांची भांडणं, त्यांचा गडबड-गोंधळ. या सर्वांवर मायेची पखरण करणारी आजी आणि क्षणिक वाद विसरून परत गुण्यागोविंदाने नांदणारी ही लोभस माणसं पाहून आपण या सुंदर घराच्या प्रेमात पडतो.

पालवीची मध्यवर्ती भूमिका मधुराणी गोखले-प्रभुलकर यांनी आपल्या सहजसुंदर अभिनयाने

साकारली आहे. खुल्या वातावरणात, मायेच्या माणसात वावरणारी पालवी, लग्नानंतर मुंबईच्या बंदिस्त जगात बावरून जाते. विभक्त कुटुंबात तिचा कोंडमारा होतो. सर्वांना एकत्र आणण्यासाठी तिची तगमग चालू होते. पालवीच्या ह्या भावना मधुराणी आपल्यापर्यंत अगदी उत्कटपणे पोहचवते. पालवीवर प्रेम करणाऱ्या, तिला हळूवारपणे समजून धीर देणाऱ्या पतीच काम राहूल मेहेंदळे यांनं केलं आहे. राहूल मेंहेंदळे म्हटलं की 'एनकाउंटर' या चित्रपटातील गँगस्टर डोळ्यासमोर उभा राहतो. या चित्रपटातील मेहेंदळेचं काम म्हणजे एक सुखद बदल वाटला. शेवटी रिॲलिटी शो म्हणजे चित्रपटाचा कळस, उत्तरोत्तर त्यातली गंमत वाढत जाते. काळे सासू-सूनांना या स्पर्धेत विजयी होता येत नाही. पण या स्पर्धेच्या निमित्ताने त्या मनाने एकत्र येतात. हळूहळू सर्वांचेच मनोमिलन होते. वंदना गुप्ते, दिलीप प्रभावळकर, नेहा जोशी, सुहास परांजपे या सर्व अभिनेत्यांची योग्य ती साथ या चित्रपटाला लाभली आहे.

दिग्दर्शक प्रमोद प्रभुलकरांची एक खासियत आहे. छोट्या छोट्या भूमिकेसाठी स्थानिक लोक जे कधीही कॅमेरासमोर उभे राहिलेले नसतात; त्यांच्याकडून अगदी चपखल काम करून घेतात. गणप्या गावडेमध्ये त्यांनी याचा यशस्वी प्रयोग केला होता. इकडेही गुहागरमधील घरातील अनेक सदस्य, अगदी लहानापासून मोठ्यांपर्यंत तसे नवीन आहेत. तसेच छोट्या छोट्या प्रसंगांतून चित्रपटाची रंजकता वाढवण्याची त्यांची हातोटी लक्षणीय आहे. उदाहरणार्थ गुहागरच्या काकूंना टी.व्ही.वरच्या 'रेसीपी' कार्यक्रम पाहून वेगवेगळे पदार्थ बनवण्याची हौस असते. अर्थात बहुधा हे प्रयत्न फसतात. पण स्वयंपाकघरात नुसता पसारा मांडून ठेवतात. स्वतः मात्र ढारंढूर झोपून जातात. इतरांनाच तो पसारा आवरावा लागतो. त्यांचं ते 'ढारंढूर पंढरपूर' लोकांना चांगलंच हसवतं. फ्लॅटची चावी विसरल्याने पालवीवर ओढवलेला फजितीचा प्रसंग किंवा ऑफिसमध्ये जायला उशीर झाल्याने घाईघाईने आंघोळ आटपणारा पालवीचा नवरा. कमरेला टॉवेल गुंडाळून चाललेली त्याची ती धावपळ; असे अनेक प्रसंग आपल्याला हसवतात, खुलवतात.

या चित्रपटाचं संगीत मधुराणी गोखले-प्रभुलकर यांनी दिलेलं आहे. त्यांचा हा पहिलाच प्रयत्न पण त्यात त्या कुठेही कमी पडल्या नाहीत. पालवीच्या तरल, संवेदनशील मनाला पोषक अशाच गीतांच्या चाली आहेत. यातील दोन गीतांचा खास उल्लेख करावा लागेल. श्रेया घोषाल हिच्या आवाजात 'सूर आले शब्द ल्याले' आणि 'उरात धडधड सुरात होते' हे हंसिका अय्यर हिच्या आवाजातील गीत. ह्या गीताची सुरावट खूपच वेगळी आहे. विशेषतः 'अन् पाऊस पडतो अंधातरी' मधला जो अल्पविराम आहे तो लाजवाब.

'सुंदर माझं घर' हा चित्रपट म्हणजे एक सुंदर कविता आहे. कोकणच्या निसर्गात ती फुलते, मुंबईच्या शहरी वातावरणात दुखावते आणि शेवटी आप्तेष्टांच्या मधुर मनोमिलनात सुखावते.

❑

**स्वाईन फ्ल्यू**

वेड्याला म्हणती गाढव
अन् मूर्खाला डुक्कर
भडकून दिला गाढवाने
डुकराला एक क्ल्यू
पहाता पहाता सर्वत्र
पसरला स्वाईन फ्ल्यू

**-अजित प्रमोद तळपदे**




मुंबई पाहारे प्रभुंची
टॉवर ट्रेन
वीर सावरकर फ्लाय ओवर ब्रिज
WR
WR
WR
WR
WR
C.R
MUMBAI
PUNE EXPRESS
C.R
C.R
प्रदीप कोठारे

# चारशे वर्षांत बदललेली चित्रे-३

❀ उज्ज्वला गोविंदराव भगवंतराव आगासकर ❀

आजची महानगरी मुंबई ही जेमतेम साडेचारशे वर्षांपूर्वी इ. स. १६६५ मध्ये कशी होती, आणि ब्रिटिशांनी येथे बदल आणि सुधारणा करण्याचा झपाटा लावल्यानंतर तिचे चित्र कसे बदलत गेले हा जितका अभ्यासाचा, तितकाच मनोरंजनाचा विषय आहे. एखाद्या अनाडी, खेडवळ मुलीचे प्रोफेसरच्या परीसस्पर्धाने 'फुलराणी'मध्ये रुपांतर व्हावे आणि 'हीच का ती?' असा पहाणाऱ्यांना प्रश्न पडावा तसेच काहीसे झाले आहे.

